# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबई स्कूल स्पोर्ट असोसिएशन या संस्थेच्या कारभारात होत असलेला गैरव्यवहार**

**(१) ११८११ (१४-०९-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.राजेश पाडवी (शहादा) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई स्कूल स्पोर्ट असोसिएशन या संस्थेचे सुमारे ४०० ते ५०० शासकीय शाळा सभासद असून ही संस्था स्वतःच गैरव्यवहार करत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेने कॅस्ट्राल (castrol) प्रा.लि. कंपनीबरोबर करारनामा करून त्या कंपनीकडून सुमारे ५०,००,००० रुपये प्रायोजक तत्वावर व इतर सामाजिक संस्थांकडून करोडो रुपये घेतले असल्याचे निदर्शनास आले असून सदर संस्थेने कोणत्याही प्रकारे शासनाची परवानगी घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेने महानगर पालिकेच्या विद्यार्थ्यांना प्राधान्य न देता इतर संस्थांच्या विद्यार्थ्यांकडून फी आकारून त्यांना प्राधान्य दिले असून संस्थेने धर्मादाय आयुक्त यांच्याकडे कोणतीही नोंदणी केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संस्थेसंदर्भात क्रीडा उपसंचालक, धर्मादाय आयुक्त व स्थानिक पोलीस स्थानक यांच्याकडे पुराव्यासहीत तक्रार दाखल केली असता अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२३-१२-२०२१) :** (१) मुंबई स्कूल स्पोर्ट असोशिएशन या संस्थेचे सुमारे ४०० ते ५०० शाळा सभासद आहेत.

(२) सदर संस्थेने कॅस्ट्रोल कंपनीकडून करारनाम्याव्दारे तसेच अन्य संस्थांकडून मोठया प्रमाणावर रकमा घेतल्या आहेत.

(३) अंशत: खरे आहे. महानगरपालिका व अन्य शाळांमधील विद्यार्थ्याना फी आकारुन संस्थेकडून प्रवेश देण्यात येतो. तसेच सदर संस्था बॉम्बे हायस्कूल ॲथलेटीक असोशिएशन या नावाने धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत आहे.

(४) व (५) संस्थेंविरुध्द धर्मादाय आयुक्त यांचेकडे तसेच पोलीस स्थानक यांच्याकडे केलेल्या तक्रारीसंदर्भात त्या कार्यालयाकडून चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

---

**कोपरगाव (जि.अहमदनगर) उपकेंद्राद्वारे भारनियमन होत असल्याबाबत**

**(२) २७१२१ (०६-०५-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील २२० के.व्ही. उपकेंद्रात ५० MVA क्षमतेचे ०२ पॉवर रोहित्र आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५० MVA च्या दोन रोहित्र्याच्या तुलनेत ९५ MW एवढा भार असल्याने ३३ के.व्ही. फिडरवर १ तासाच्या अंतराने अत्यावश्यक भारनियमन करावे लागत असल्याची बाब दिनांक २ फेबुवारी, २०२० रोजी वा

त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोपरगाव उपकेंद्र येथे चार नवीन बे साठी व वाढीव २५/५० MVA क्षमतेचे नवीन पॉवर ट्रॅान्सफॉर्मर मिळावे यासाठी वरिष्ठ EHV (अतिरक्त उच्च दाब वाहिनी) कार्यालयास पत्रव्यहार केल्यानुसार १+३ चे नवीन बे चे काम पूर्ण करण्यासाठी विज पारेषण कंपनीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०२१) :** (१) व (२) अहमदनगर मंडळांतर्गत कोपरगाव येथे महापारेषण कंपनीचे २२०/१३२/३३ के.व्ही. उपकेंद्र कार्यान्वित आहे. सदरील उपकेंद्रात २२०/३३ के.व्ही. प्रकारचे ५० MVA क्षमतेचे दोन रोहित्र कार्यरत आहे. सदरील दोन्ही रोहित्रांवर ९५ MVA (८८मे.वॅ.) एवढा सर्वोच्च विद्युतभार दिनांक ०५ मार्च,२०२० रोजी नोंदविण्यात आलेला आहे. सदरील दोन रोहित्रांवर एकत्रित मिळून सरासरी ७०-७५ MVA एवढा विद्युतभार असतो व हा विद्युत भार एकूण स्थापित क्षमतेपेक्षा कमी असल्याकारणाने कोपरगाव येथील २२० के.व्ही. उपकेंद्रातून निघणा-या ३३ के.व्ही. वाहिन्यांवर भारनियमन करण्यात आलेले नाही.
(३) महावितरण कंपनीने २२० के.व्ही. कोपरगाव उपकेंद्र येथून ३३ के.व्ही. च्या दोन फिडरची (संवत्सर व सिंगवे) मागणी केलेली आहे. त्यानुसार ३३ के.व्ही. संवत्सर हा फिडर दि. २५.०६.२०२० रोजी कार्यन्वित करण्यात आलेला असून सिंगवे फिडरचे काम प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**कोरोनाच्या साथीत बोगस औषधांची विक्री वाढल्याबाबत**

**(३) २७२४६ (११-०६-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: बुलडाणा जिल्हा व पुणे शहरासह कोरोना रुग्णसंख्येत वाढ होत असताना तसेच रेमीडेसिवीर औषधांच्या तुटवडयामुळे मृत्युसंख्येत वाढ झाल्याने रेमीडेसिवीर, टोसीलोझुमैब सह इतर औषधांची मागणी वाढल्याने या औषधांचा काळाबाजार तसेच बोगस औषधांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयात काळयाबाजारात जास्त दराने रेमेडिसिवीर औषध विक्री करणाऱ्या दोन टोळयांचा छडा स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने लावून तिघांना अटक केली, असून राजारामपूरी पोलिसांनी शिवाजी उद्यमनगर परिसरातील एका रुग्णांलयातून परिचारीकालाही अटक केली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक येथे पंचवटीतील ३ परिचारीकेसह औषधांच्या दुकानातील कर्मचाऱ्यासही पोलिसांनी अटक केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या औषधाची खरेदी प्रक्रिया राबवून जिल्हा प्रशासनाला याचा पुरेसा साठा तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत तसेच खाजगी रुग्णालयात देखील सदर औषध मोफत उपलब्ध करून देण्याबाबत मा.विधानसभा, विरोधी पक्षनेता यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्या-सुमारास विनंती केली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली, तसेच औषधांचा पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा

करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२९-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) खरे आहे.
(५) यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे. कोविड-१९ च्या रुग्णसंख्येत झपाट्याने वाढ झाल्याने या आजारासाठी लागणाऱ्या रेमडेसिवीर, टॉसिलीझ्युमॅब या औषधांचा तुटवडा निर्माण झाला होता. काळाबाजार होऊ नये म्हणून प्रशासनाने नियंत्रण ठेवून संबंधितावर कारवाई केली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील रेमडेसिवीर औषधांच्या काळाबाजार प्रकरणी २ प्रकरणात शाहुपूरी पोलीस स्टेशन येथे प्रथम खबर अहवाल (FIR) क्र. ०२२६/२०२१ व राजारामपूरी पोलीस स्टेशन येथे प्रथम खबर अहवाल (FIR) क्र.०१६१/२०२१ दाखल केले आहेत.

आडगाव पोलीस स्टेशन नाशिक येथे प्रथम खबर अहवाल (FIR) क्रमांक ७४/२०२१ दाखल केला आहे.

रेमडेसिवीर इंजेक्शनचा काळाबाजार रोखण्यासाठी व पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने त्याचे वाटप जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बदलापूर (जिल्हा ठाणे) येथील सर्वे क्रमांक १४८ २४३ व २६ मधील आरक्षित जमिनींबाबत

**(४) २८७९० (११-०६-२०२१). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील सर्वे क्रमांक १४८ मधील ०.३७ हेक्टर, सर्वे क्रमांक २४३ मधील ०३४.९ हेक्टर आणि ०.३६.७ हेक्टर तर सर्वे क्रमांक ३६ मधील ०३५.६ हेक्टर या जमिनी शासनाकडून वक्फ महामंडळाच्या नावे विकास कामांसाठी आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून वक्फ महामंडळाच्या नावे नोंद असलेल्या चार सर्वे क्रमांकाच्या जमिनी वक्फ महामंडळाची परवानगी न घेता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद येथील मुख्य कार्यकारी पदाचा बनावट रबरी शिक्का आणि त्यांच्या बनावट स्वाक्षरीचा वापर करत ना हरकत प्रमाणपत्राच्या माध्यमातून दस्त नोंदणी करून हडप करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी तक्रारी प्राप्त झाल्यानंतर बदलापूर (पश्चिम) पोलीस ठाण्यात एक राजकीय व्यक्ती तसेच प्रतिष्ठित डॉक्टर कुटुंबासह सात जणांवर दिनांक २५ मे, २०२१ रोजी व त्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. अब्दुल सत्तार (२२-०६-२०२१) :** (१) नाही. जुम्मा मस्जीद ट्रस्ट, बदलापुर ही संस्था वक्फ अधिनियम, १९९५ चे कलम ३६ नुसार क्रमांक MSBW/THN/१६१/२००९ अन्वये दि.२१/०१/२०१० रोजी वक्फ मंडळ कार्यालयात नोंदणीकृत करण्यात आलेली आहे. सर्वे नं. १४८/१, क्षेत्र ०.३७.०२ हे.आर, सर्वे नं. २४३/०४ क्षेत्र ०.३४.०९ हे.आर, सर्वे नं. २४३/५, क्षेत्र ०.३६.०७ हे.आर आणि सर्वे नं. ३६/४ क्षेत्र ०.३५.६ हे.आर. या जमीनी वक्फ संस्थेच्या मिळकती आहेत.
(२) होय.
(३) सदरील प्रकरणाची पुढील चौकशी व कार्यवाही पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन, बदलापूर यांच्या तर्फे करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील मे.ॲन्टालिया कमर्शिअल प्रा.लि. या कंपनीस वक्फ महामंडळाच्या मालकीचा भूखंड अल्प दरात विकून केलेला गैरव्यवहार

**(५) २८८१६ (११-०६-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करीमभाई ईब्राहीमभाई खोजा ऑफर्नेज या धर्मादाय संस्थेने त्यांच्या मालकीचा खोजा मुस्लिम मुलांच्या शिक्षणासाठी समर्पित असलेला मलबार हिल परिसरातील जवळपास ५०० कोटी रूपयांचा भूखंड माहे जुलै, २००२ मध्ये वा त्यादरम्यान ॲन्टालिया कमर्शिअल प्रा.लि. या कंपनीस केवळ २१ कोटी ५० लाख रूपयांना विकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जमीन ही वक्फ मालमत्ता असल्याने सदरहू जमीनीची विक्री करण्यापूर्वी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची मान्यता घेणे अनिवार्य असताना अशी कोणतीही मान्यता न घेता सदरहू भूखंडाची विक्री करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भूखंडाच्या विक्री प्रकरणी ॲन्टालिया कमर्शिअल प्रा.लि. यांना माहे एप्रिल, २००४ वा त्या दरम्यान महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळामार्फत नोटीस बजावली असता करीमभाई ईब्राहीमभाई खोजा ऑफर्नेज या धर्मादाय संस्थेने महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे केवळा रु.१६ लाख इतक्या नाममात्र रकमेचा भरणा केला असता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने सदरहू नोटीस दिनांक २३ मार्च, २००५ रोजी वा त्यासुमारास मागे घेतली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बाजार भावापेक्षा कमी दराने सदरहू जमिनीच्या झालेल्या खरेदी-विक्री चा झालेला व्यवहार तसेच या प्रकरणी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळामार्फत बजाविण्यात आलेली व कालांतराने मागे घेण्यात आलेली नोटीस हे सर्व संशयास्पद असल्याने या प्रकरणी सी.बी.आय. मार्फत तपास करण्याकरिता केंद्र शासनाने राज्य शासनास माहे डिसेंबर, २०१० मध्ये सूचना केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू सूचनेच्या अनुषंगाने या प्रकरणी विधी व न्याय विभागाचे मत घेण्यात येवून सदरहू प्रकरण दिनांक २५ जुलै, २०११ रोजी वा त्या सुमारास गृह विभागाकडे अभिप्रायार्थ पाठविण्यात आले होते, यावर गृह विभागाने काय अभिप्राय दिले असून त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच सीबीआय मार्फत चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच ॲन्टालिया कमर्शिअल प्रा.लि. यांचेकडून या जमिनीची बाजारमूल्यानुसार किंमत व्याजासह वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**श्री. अब्दुल सत्तार (२२-०६-२०२१) :** (१) अशंत: खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) सदर प्रकरणी गृह विभागाकडून या विभागास अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत. सदरचे प्रकरण त्यावेळी मा.उच्च न्यायालयापुढे न्यायप्रविष्ठ होते व सद्य:स्थितीत मा.सर्वोच्च न्यायालयापुढे न्यायप्रविष्ठ आहे.

(६) सदरचे प्रकरण सद्य:स्थितीत मा.सर्वोच्च न्यायालयापुढे न्यायप्रविष्ठ आहे

---

## अमरावती अपर आयुक्त, आदिवासी विकास विभागाच्या बनावट आदेशाद्वारे नोकरभरती होत असल्याबाबत

**(६) २९११७ (१५-०६-२०२१). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या अमरावती अपर आयुक्तांच्या कार्यक्षेत्रांतर्गत वरीष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, परिचारक या पदांसाठी पात्र झालेल्या उमेदवारांना त्यांची मूळ कागदपत्रे तपासण्यासाठी बोलाविण्यात

आले होते, परंतु पात्र उमेदवार कागदपत्रे तपासण्यासाठी गेले असता अशी कोणत्याही प्रकारची पद भरती करण्यात येणार नसल्याचे दिनांक २५ मार्च, २०२१ रोजी वा त्या सुमारास कार्यालयाकडून सांगण्यात आल्याने उमेदवारांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभाग आयुक्तालयाच्या नावे बनावट आदेशाद्वारे नोकरभरतीची जाहिरात आणि लिंक प्रसिध्द झाली असून सदरहू लिंकमुळे येणारे संकेतस्थळ हे बनावट असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बनावट आदेशाद्वारे नोकरभरती करण्याऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०९-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे,

(२) संकेतस्थळावर लिंक दिसून आली नाही.

(३) सदर फसवणूकीसाठी कोणत्याही उमेदवाराने बळी पडू नये, अशा आशयाची प्रेस नोट प्रसिध्द करण्यासाठी जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व प्रसिध्दी, अमरावती यांना कळविण्यात आले असून पोलीस निरीक्षक,पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा सायबर क्राईम शाखा,अमरावती यांना कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.होमी भाभा राज्य विद्यापीठातील कुलगुरु व इतर रिक्त पदे भरुन सोईसुविधा पुरविण्याबाबत**

**(७) ४४५६१ (१७-०९-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्य शासनाने सन २०१९ मध्ये राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानांतर्गत (रुसा) विज्ञान संस्था, एल्फिन्स्टन कॉलेज, सिडनहम कॉलेज, शासकीय अध्यापक कॉलेज या संस्थांचे मिळून स्थापन केलेल्या डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाला तीन वर्षांनंतरही कुलगुरुची प्रतीक्षा असून अनेक पदे रिक्त असल्याचे माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुसामार्फत पहिल्या टप्प्यातील कामासाठी मंजुर केलेला ५५ कोटी व राज्य शासनाने द्यावयाच्या ४० टक्के निधी अद्यापही या विद्यापीठास उपलब्ध करुन देण्यात न आल्याने नव्या योजना, अभ्यासक्रम, पायाभूत सुविधांचा विकास होऊ शकलेला नाही, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार होमी भाभा क्लस्टर विद्यापीठात कायम कुलगुरु नियुक्त करुन तसेच विद्यापीठांतर्गत येणाऱ्या कॉलेजमधील रिक्त पदांच्या भरतीबाबत तसेच पायाभूत सुविधांसाठी जाहीर केलेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०८-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत सदर विद्यापीठास मंजूर केलेल्या रु.५५ कोटी निधीपैकी ६० टक्के (रु.३३ कोटी) केंद्र हिस्सा व ४० टक्के (रु.२२ कोटी) राज्य हिस्सा अशा पध्दतीने निधी वितरीत केला जातो. तथापि, केंद्र शासनाकडून अद्याप निधी उपलब्ध न झाल्याने राज्य हिस्सा वितरीत करण्यात आलेला नाही. परंतु, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात कार्यालयीन खर्चाकरिता पुनर्विनियोजनाद्वारे रु.३,२१,८१,०९८/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच, विद्यार्थ्यांची शैक्षणिक आवड लक्षात घेता विद्यापीठस्तरावर नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आले असून पायाभूत सुविधा विषयक कामे सुरु आहेत.

(३) डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई या समूह विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून डॉ.रजनीश कामत, वरिष्ठ प्राध्यापक व अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांची दि. ०३.०८.२०२२ रोजीच्या आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठांतर्गत येणा-या घटक महाविद्यालयातील रिक्त असलेली पदे शासन अधिसूचना दि.०७.०४.२०२२ च्या नवीन आरक्षण धोरणानुसार संवर्ग निहाय तयार करण्यात आलेल्या बिंदूनामावलींना अंतीम मान्यता घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात तक्रार निवारण मंचामधील रिक्त पदे भरुन सोईसुविधा पुरविण्याबाबत**

**(८) ४५०९६ (१६-०९-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्राहक तक्रार निवारण मंच, पोलीस तक्रार निवारण मंच, राज्य महिला आयोग, बालहक्क संरक्षण आयोग, ऋणवसुली आयोग अशा विविध मंचामध्ये पदे रिक्त असून सुविधांची कमतरता असल्यामुळे नागरिकांची प्रकरणे सुनावणी अभावी प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऋणवसुली आयोगामध्ये मागील दोन वर्षापासून रिक्त असलेल्या अध्यक्ष आणि अन्य पदांबाबत मुंबई उच्च न्यायालयाने वेळोवेळी नाराजी व्यक्त करुन ही अद्याप सदर रिक्त पदे न भरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) तसेच ग्राहक मंचाच्या प्रलंबित सुनावण्या नियमित घेण्यासाठी व इतर सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०९-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्न भाग-१ मध्ये नमूद आयोगासंदर्भातील कार्यवाही शासनाच्या वेगवेगळया विभागामार्फत केली जाते.

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग :- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ अंतर्गत राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व एकूण ४० जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे कामकाज हाताळले जाते. या आयोगासाठी अध्यक्ष व सदस्य यांची मंजूर पदसंख्या १३२ आहे. सद्य:स्थितीत (सप्टेंबर,२०२२ च्या स्थिती) यापैकी ३८ पदे रिक्त आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या याचिका क्र.१०९६/२०२१ व जनहित याचिका क्र.११/२०२१ मधील दि.१४.०९.२०२१ च्या निर्णयान्वये केंद्र शासनाच्या पात्रता नियमातील नियम ३ (२) (b), ४ (२) (c) व ६(९) च्या तरतुदी अवैध ठरल्या असून त्यानुसार मा.न्यायालयाने राज्य शासनाने ३२ रिक्त पदांसाठी राबविलेली निवडप्रक्रिया रद्द केली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयात केंद्र शासन व राज्य शासन यांनी विशेष अनुमती याचिका दाखल केली असून प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

राज्य पोलिस तक्रार प्राधिकरण :- सदर प्राधिकरणाबाबत गृह विभागाकडून कामकाज हाताळण्यात येते. या प्राधिकरणामध्ये "सदस्य-समाज मान्यवर व्यक्ती" या पदावर नियुक्त सदस्य नियुक्तीनंतर अपात्र ठरल्याने त्यांची नियुक्ती रद्द करण्यात आली. तर "सदस्य (पोलिस)" या पदावर नियुक्त सदस्य सदर पदावर हजर झालेले नाहीत. या पदावर नियुक्तीची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. विभागीय पोलिस तक्रार प्राधिकरण, अमरावती वगळता इतर विभागीय स्तरावरील अध्यक्षांची पदे भरण्यात आली आहेत.

प्राधिकरणाकडे बाह्ययंत्रणेद्वारे व सेवा करारावर मनुष्यबळ उपलब्ध आहेत. या प्राधिकरणाच्या कार्यालयासाठी नरीमन पॉईंट येथे ५९८०.२० चौ.फुट एवढी प्रशस्त जागा भाड्याने घेतली असून त्यामध्ये सुविधाजनक मध्यवर्ती वातानुकूलित व्यवस्था, प्रशस्त आसनव्यवस्था, इंटरनेट, झेरॉक्स मशीन इ. आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध आहेत.
राज्य महिला आयोग :-

या आयोगाचे कामकाज महिला व बालविकास विभागाकडून हाताळले जाते. राज्य महिला आयोगाची स्थापना महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ अन्वये करण्यात आली आहे. सदर आयोगातील अध्यक्ष व सहा सदस्य ही पदे अनुक्रमे अधिसूचना दि.२०.१०.२०२१ व दि.२५.०१.२०२२ अन्वये भरण्यात आलेली आहेत.

राज्य बाल हक्क संरक्षण आयोग :-

या आयोगाचे कामकाज महिला व बाल विकास विभागाकडून हाताळले जाते. बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ अंतर्गत अधिसूचना दि.२९.०४.२०२२ अन्वये अध्यक्ष व ६ सदस्य यांची नियुक्ती सदर राज्य आयोगावर करण्यात आली आहे.

ऋणवसुली आयोग :-

सदर आयोग हा केंद्र शासनाच्या अखत्यारितील आयोग आहे.

(२) राज्य शासनाशी संबंधित नाही.

(३) जिल्हा आयोगातील अध्यक्ष पद रिक्त असलेल्या जिल्ह्यामध्ये न्यायिक कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने शासनाने वेळोवेळी अधिसूचना निर्गमित करुन नजिकच्या जिल्हा आयोगातील अध्यक्षांना अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे.

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र येथील सदस्यांची ७ पदे रिक्त असून दोन न्यायिक सदस्य व दोन गैर-न्यायिक सदस्य पदे कार्यरत आहेत. राज्य आयोगाचे मुंबई येथील पीठ मुख्यपीठ असल्याने मा.अध्यक्ष यांचेसोबत १५ दिवस औरंगाबाद/नागपूर येथील न्यायिक सदस्यांची नेमणूक करुन पीठसंरचना केली जाते व नियमित सुनावणी घेतली जाते. तसेच नागपूर व औरंगाबाद येथील तातडीची प्रकरणे सुनावणीसाठी आल्यास आभासी पद्धतीने सुनावणी घेतली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची पदे बऱ्याच वर्षापासून रिक्त असल्याबाबत**

**(९) ४५२०२ (०६-१०-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण) : दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८६ मधील प्रश्न क्रमांक ३२५१७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील तालुकास्तरावर तालुका क्रीडा अधिकारी पदे भरण्याचा यापूर्वीच निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने, सन २००० या कालावधीत क्रीडा अधिकाऱ्यांची रिक्त असणारी पदे भरण्याचा शासनाने निर्णय घेऊन, त्यानुसार ३२ क्रीडा अधिकाऱ्यांची पदे भरण्यात आली तर सन २०१२ या कालावधीत ६९ क्रीडा अधिकाऱ्यांची पदे मंजूर करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा जिल्ह्यातील ११ तालुक्यांपैकी केवळ खटाव या एकाच तालुक्यामध्ये क्रीडा अधिकाऱ्यांचे पद भरण्यात आले असून उर्वरित १० तालुक्यामधील क्रीडा अधिकाऱ्यांची पदे रिक्त असतानाही अद्याप भरण्यात आली नसल्याचे दिनांक २५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी खेळांडूचे विविध प्रश्न व अडचणींचा विचार करता क्रीडा अधिकाऱ्यांअभावी खेळाडुंना कोणत्याच कामाचा वा शासकीय योजनांचा लाभ घेता येत नसल्याने खेळाडूंना मुंबई वा पुणे येथे जाऊन मार्गदर्शन घेण्याची पाळी येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (१६-१२-२०२२) :** (१) व (२) होय.

(३) सातारा जिल्हाकरिता एकूण ३ तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची मंजूर आहेत. (खटाव, कराड व फलटण) यापैकी खटाव व कराड येथील तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची पदे भरलेली आहेत.

(४) व (५) तालुका क्रीडा अधिकारी संवर्गातील सरळसेवेची १५ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरळसेवा कोट्यातील ८० टक्के पदे भरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच क्रीडा विभागाचा आकृतिबंध मंजूर करण्याची कार्यवाही सुरू असून त्यानुसार सातारा जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यासाठी तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची पदे नव्याने मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोरापाडा (जि.नंदुरबार) येथील बालिका आश्रमातून दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याबाबत

**(१०) ४५६४१ (०२-०७-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोरापाडा (जि.नंदुरबार) येथील बालिका आश्रमातून दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची घटना दिनांक ५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडल्याची निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमाच्या अधिक्षकांच्या फिर्यादीवरुन अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार काय आढळून आले, त्यानुसार आरोपींना अटक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी रुखमाबाई बालिकाश्रम, सोरापाडाच्या अधीक्षक यांनी दिनांक ०१.०६.२०२२ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार अक्कलकुवा पोलीस ठाणे, नंदुरबार येथे गु.र.क्र.२४२/२०२२, भा.दं.वि. कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यासंदर्भात करण्यात आलेल्या तपासाअंती, रुखमाबाई बालिकाश्रम शाळेतील दोन्ही बालिकांचे कोणीही अपहरण केले नसून त्यांना आश्रमशाळेत राहण्याचा कंटाळा आल्याने त्या कुणालाही न सांगता, फिरण्याकरीता आश्रमशाळेतून स्वत:हून निघून गेल्या असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर दोन्ही बालिकांचा शोध घेण्यात आला असता त्या सुरत, गुजरात येथे सापडल्या आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

## हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरी व आंतरराष्ट्रीय कुस्तीगिरांचे मानधन गेल्या सहा महिन्यांपासून रखडल्याबाबत

**(११) ४५९५० (३१-१०-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरी व आंतरराष्ट्रीय कुस्तीगिर अशा ज्येष्ठ मल्लांना देण्यात येणारे मानधन गेल्या सहा महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे त्यांच्या विधवा पत्नींचेही मानधन प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी ज्येष्ठ मल्लांचे व त्यांच्या विधवा पत्नींचे मानधन देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (१६-१२-२०२२) :** (१), (२) व (३) शासन निर्णय दि. २१.१२.२०१२ नुसार राज्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृद्ध खेळाडू व कुस्तीगीर यांचे जुलै २०२२ पर्यंतचे मानधन वितरित करण्यात आलेले आहे. तसेच डिसेंबर २०२२ पर्यंतचे मानधन वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे. वयोवृद्ध खेळाडूंच्या विधवा पत्नींना मानधन मंजूर करण्याबाबत निर्णय दि. २६.९.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

### चोपडा, यावल (जि.जळगाव) तालुक्यात रसायनयुक्त दुधाचा पुरवठा होत असल्याबाबत

**(१२) ४७९११० (१७-०९-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा, यावल (जि.जळगांव) तालुक्यातून पामतेल व दुधाची भुकटी या मिश्रणातून तयार होत असलेले दूध जळगावसह उत्तर महाराष्ट्रात वितरित होत असल्याचे दिनांक २६ मार्च,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पामतेल व अन्य रसायनांच्या दुध अथवा अन्य पदार्थामुळे कॅन्सर, किडनी, आतडे, मेंदूचे विकार होतात तसेच हृदयविकारही होतो हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे आहे, त्यानुसार रसायनयुक्त दूधाचे उत्पादन व विक्री रोखण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२०-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) या संदर्भातील अधिकृत ठोस वैद्यकीय माहिती/अहवाल अन्न व औषध प्रशासनाकडे उपलब्ध नाही. तरीसुध्दा अशाप्रकारे बेकायदेशीर भेसळ करणाऱ्या दुधविक्रेत्यांविरुध्द अन्न व औषध प्रशासनामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.
(३) या संदर्भात अन्न व औषध प्रशासनाने चौकशी केली असून दि. २३.०३.२०२२ रोजी पोलीसांचे मदतीने अन्न व औषध प्रशासनाकडून घेतलेल्या कारवाईचे वेळी गट नंबर १८०, बिडगाव येथे झोपडीवजा जागेत दूध व खाद्यतेल, दुध भुकटी दुधात भेसळ करताना आरोपींना रंगेहात पकडून सदर प्रकरणी १) म्हशीचे दूध २) व्हे पावडर ३) पामोलीन तेल ४) दुध व तेल यांचे मिश्रणाचा भेसळकारी दूध असे ४ नमुने विश्लेषणास्तव घेण्यात आले असून म्हैस दूधाचा एकूण २०७८ लिटर दूधाचा साठा किंमत रु. १,०३,९००/- दुध व तेल यांचे मिश्रणाचा भेसळकारी दूध- एकूण १३ लिटर- किंमत रुपये ६५०/-, व्हे पावडर-१८ कि.ग्रॅ. किंमत रुपये ९००/- पामोलीन तेल- ८३,४०० कि.ग्रॅ.- किंमत रु. १४३१७/- जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी दिनांक २४.०३.२०२२ रोजी अडावद पोलीस स्टेशन, चोपडा येथे ०५ आरोपीविरुध्द अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलमासह भादंवि कलम ३४, २७२,२७३ व ३२८ अंतर्गत ३९/२०२२ फिर्याद दाखल करण्यात आली आहे. कारवाईतील संबंधित सर्व ०५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणी पोलीसांनी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, चोपडा न्यायालयात ०५ आरोपीविरुध्द आरोप पत्र क्र.१६/२०२२, दि. २७.०५.२०२२ रोजी दाखल केले आहे.

तसेच म्हशीचे दूध या अन्न नमुन्याच्या विश्लेषण अहवालाचे अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाकडून पुढील कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई पोलीस दलातील ४० हजार पोलीसांचा बेस्टचा मोफत प्रवास मागील ४ महिन्यांपासून बंद असल्याबाबत

**(१३) ४९६९२ (२६-१२-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस दलातील ४० हजार पोलीसांचा बेस्टचा मोफत प्रवास बंद करण्यात आला असून त्यांना २ हजार ७०० रुपये प्रवास भत्ता देण्याचे आश्वासन देण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४ महिने उलटूनही अद्याप प्रवास भत्ता सुरु करण्यात न आल्यामुळे पोलीसांना स्वखर्चाने तिकिट काढून प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई वगळता राज्यातील सर्व पोलीसांना सन १९९१ पासून प्रवास भत्ता सुरु करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शासकीय निर्णयात बदल करुन मुंबईसाठी देखील प्रवास भत्ता सुरु करणेबाबत व ते मान्य होईपर्यंत मोफत प्रवासाची सवलत सुरु ठेवणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक ०४ मार्च, १९९१ अन्वये मुंबई महापालिकेच्या बी.ई. एस. टी. व पुणे, कोल्हापूर, सोलापूर व इतर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या बसेसमधून कर्तव्यार्थ विनातिकीट पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रवास खर्चापोटी त्या-त्या परिवहन उपक्रमास अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत होते. महानगरपालिका क्षेत्रातील पोलीस अंमलदारांना सदरहू नि:शुल्क प्रवासापोटी वाहतुक भत्ता देय नव्हता.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयाने यासंदर्भात आढावा घेतला असता, बहुतांश कर्मचारी रेल्वेने व स्वत:चे खाजगी वाहनाने प्रवास करतात व खूप कमी अधिकारी/कर्मचारी बेस्ट बसेसचा उपयोग करतात असे निर्देशनास आल्याने, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयाकडून गृह विभाग, शासन निर्णय दिनांक ४ मार्च, १९९१ रद्द करुन वित्त विभाग दिनांक २० एप्रिल, २०२२ नुसार वाहतूक भत्ता अनुज्ञेय करण्याबाबत शासनास विनंती करण्यात आली होती. या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केलेली शिफारस व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचा प्रस्ताव विचारात घेवून, शासन निर्णय दिनांक २१.१०.२०२२ अन्वये शासन निर्णय, दिनांक ४ मार्च, १९९१ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात येवून, त्याऐवजी वित्त विभागाच्या दिनांक २० एप्रिल, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार वाहतूक भत्ता पोलीस अधिकारी व अंमलदारांना अनुज्ञेय करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वस्त धान्य दुकानांमध्ये धान्यासोबतच चहा-कॉफी, साबण विकण्याच्या आदेशाची अंमलबजावणी होण्याबाबत

**(१४) ५०१८८ (१८-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वस्त धान्य दुकानांमध्ये चहा-कॉफी, साबण विकण्याबाबत माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासन निर्णय निर्गमीत करण्यात येऊनही प्रत्यक्षात स्वस्त धान्य दुकानातून चहा-कॉफी,साबण मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय निर्गमीत करण्यात येऊनही त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही. सदरचा शासन निर्णय मार्च, २०२२ मध्ये घेतलेला नसून, शासनाच्या दि.१७ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या निर्णयान्वये खुल्या बाजारातील साबण (आंघोळ व धुण्याचा), हेण्डबॉश, डिटर्जंटस (धुण्याचा सोडा), शाम्पू, चहापत्ती व कॉफी शिधावाटप/रास्तभाव दुकानांमध्ये विक्रीसाठी ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(२) सदर परवानगी दिलेल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी रास्त भाव दुकानदारांनी संबंधित वस्तूंच्या वितरकांशी परस्पर संपर्क साधणे आवश्यक आहे. सदर उत्पादनांच्या विक्रीची संकल्पना रास्त भाव दुकानदारांसाठी व शिधापत्रिकाधारकांसाठी आहे.

सबब, दि.१७.११.२०२१ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे रास्त भाव दुकानदारांवर अवलंबून असून सदर विक्रीची रास्त भाव दुकानदारांवर सक्ती करता येत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील कुळगाव-बदलापूर नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून अतिरिक्त शुल्क आकारुन विदयुत देयके दिल्याबाबत**

**(१५) ५०९०४ (२६-१२-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून अतिरिक्त शुल्क आकारणी करुन घरगुती विदयुत देयके दिल्याने नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात संतापाचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले ,हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्-नुसार महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीला अव्वाच्या सव्वा देयक देऊन नागरिकांना वेठीस धरणाऱ्या वीज बिल एजन्सी व सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कठोर कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आह,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१२-२०२२) :** (१) महावितरणच्या कल्याण परिमंडळातंर्गत अंबरनाथ पूर्व व पश्चिम तसेच कुळगाव-बदलापूर पूर्व व पश्चिम उपविभागातील उच्चदाब व लघुदाब ग्राहकांना माहे एप्रिल, २०२२ मध्ये अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम स्वतंत्र देयकाद्वारे मागणी केली असल्याने माहे मे २०२२ मध्ये वा त्या दरम्यान या देयकांबाबत नागरिकांमध्ये मोठया प्रमाणात संतापाचे वातावरण निर्माण झाल्याचे निदर्शनास आले होते.
(२) मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी विनियम २०२१ च्या तरतूदी नुसार माहे एप्रिल-२०२२ या महिन्यात ग्राहकांना अतिरिक्त सुरक्षा अनामत रकमेची स्वतंत्र ६ समान मासिक हप्त्यामध्ये भरण्याच्या पर्यायासह देण्यात आली आहेत. तसेच सदर रकमेवर प्रचलित दरानुसार व्याज अदा करण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई विद्यापीठाकडून तृतीय वर्षातील पाचव्या सत्राच्या विधी परीक्षेबाबत

**(१६) ५२१३९ (२६-१२-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती विद्या ठाकूर (गोरेगाव), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाकडून तृतीय वर्षातील पाचव्या सत्राच्या विधी परीक्षेला २८ दिवस शिल्लक असतानाही परीक्षा अर्ज भरण्यास सुरुवात झाली नसल्याने विद्यार्थी तणावाखाली आले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यादरम्यान एमकेसीएलमधील तांत्रिक अडचणीमुळे महाविद्यालयांना विद्यार्थ्यांच्या चारही सत्राचे गुण विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करणे शक्य होत नसल्याने हजारो विद्यार्थी पाचव्या सत्राच्या परीक्षेस बसता येणार नसल्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विधी परीक्षेतील तांत्रिक गोंधळ दूर करून विद्यार्थ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२८-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठाने त्यांचे परिपत्रक, दिनांक ०१ सप्टेंबर, २०२२ अन्वये हिवाळी, २०२२ मध्ये होणा-या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश अर्ज विहित वेळेत भरण्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत त्यामध्ये विधी-तृतीय वर्ष सत्र ५ चा ही समावेश आहे.

विद्यार्थ्यांची प्रथम व द्वितीय वर्षाच्या प्रवेश नोंदणी होऊ न शकल्याने काही महाविद्यालयांना अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश अर्ज भरण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. परंतु, सर्व अडचणींचे निराकरण करण्यात आले आहे.

दिनांक २५.१०.२०२२ च्या सूचनेन्वये विधी तृतीय वर्ष ५ व्या सत्राच्या परीक्षेचे वेळापत्रक निर्गमित करण्यात आले होते. विधी तृतीय वर्ष सत्र ५ च्या परीक्षा विहित वेळेत घेण्यात आल्या आहेत.

कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिलेला नाही.

४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव परिसरासह राज्यातील इतर जिल्हयात वारंवार खंडीत वीजपुरठामुळे रब्बी पिकासह भाजीपाला पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत

**(१७) ५२५९० (२६-१२-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) अंजनगाव (जि.अमरावती) तालुक्यातील शेतातील कृषिपंपाचा विदयुत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने रब्बी पिकासह भाजीपाला पिकांचे नुकसान होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषीपंपांचा विदयुत पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने लाखो रुपयांच्या पेरलेल्या पिकांना सिंचन सुरळीत होत नाही, ट्रान्सफॉर्मर जळत असून ते दुरुस्त होत नाहीत तसेच विदयुत वितरण कंपनीकडून नवीन ट्रान्सफॉर्मर मिळत नसल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन तातडीने कृषीपंपांना विदयुत पुरवठा देण्याबाबत व सदरील प्रकरणास दोषी असणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शेतातील कृषीपंपाचा विद्युत पुरवठा काही ठिकाणी रोहित्र बिघाडानंतर किंवा रोहित्र जळाल्यानंतर किंवा वितरण यंत्रणेमध्ये बिघाड झाल्यामुळे तात्पुरता खंडित होतो.

(२) हे खरे नाही.

शेतकऱ्यांचा वीज पुरवठा तांत्रिक बिघाडामुळे खंडित झाल्यास कमीत कमी वेळेत महावितरणचे कर्मचारी व सूचिबध्द कंत्राटदरांमार्फत दुरुस्ती करुन वीज पुरवठा पूर्ववत करण्यात येतो. रोहित्र बिघाडानंतर किंवा जळाल्यानंतर सदर रोहित्रावरील ८०% कृषी ग्राहकांनी चालू वीज बिलाचा भरणा केल्यानंतर सदर ठिकाणचे नादुरुस्त रोहित्र प्राधान्याने बदलण्यात येते.

(३) कृषीपंपांना सुरळीत वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने बिघाड/ नादुरुस्त/ जळालेले रोहित्र प्राधान्याने बदलण्याचे निर्देशित करण्यात आलेले आहे. सदरील रोहित्रासाठी आवश्यक असलेल्या ऑईलचा पुरवठा आवश्यकतेनुसार क्षेत्रीय कार्यालयांना करण्यात येत आहे. नादुरुस्त रोहित्र दुरुस्ती करण्यासाठी विभागीय स्तरावर सूचीबध्द कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. जेणेकरुन नादुरुस्त रोहित्र कमीत कमी वेळेत बदली करुन वीज पुरवठा सुरळीत होईल याची दक्षता घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या कुर्ला येथील एल वॉर्ड विभाग कार्यालयात बनावट कागदपत्रांच्या आधारे २३ कामगारांची अनुकंपा तत्वावर भरती केल्याबाबत

**(१८) ५३२६६ (२६-१२-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या कुर्ला येथील एल वॉर्ड विभाग कार्यालयात (घनकचरा व्यवस्थापन) सन २०१७ ते २०१९ या कालावधीत बनावट कागदपत्रांच्या आधारे २३ कामगारांची अनुकंपा तत्वावर भरती करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरकारभार उघडकीस येताच कुर्ला पोलिसांनी पालिकेच्या आजी-माजी अधिकाऱ्यांना अटक करण्यात आल्याची बाब दि. ६.१०.२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार अटक करण्यात आलेल्या संबधित दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१२-२०२२) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी कुर्ला पोलीस स्टेशन, मुंबई येथे गु. र. क्र. ५१५/२०२१, भा. दं. वि. कलम ४१९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब), २०१ अन्वये दि. २५/०८/२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एकूण चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित दोन फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

अटक करण्यात आलेल्या चार आरोपींविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील लाभार्थी शिधापत्रिकेअभावी धान्यापासून वंचित असल्याबाबत**

**(१९) ५४०४५ (१८-०१-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील लाभार्थी शिधापत्रिकेअभावी धान्यापासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिधापत्रिकांपासून वंचित असणा-या आदिवासींना तात्काळ शिधा पत्रिका देवून धान्य मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्यभरातील सर्व गरीब गरजू नागरिक शिधा पत्रिका नसल्यास धान्याच्या लाभापासून वंचित राहू नयेत म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०६-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही. जिल्हा पुरवठा अधिकारी, पालघर यांनी चौकशी केली असता जव्हार (जि. पालघर) तालुक्यामध्ये जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत शिधापत्रिकेसाठी एकुण २७४५ अर्ज प्राप्त झाले असून, सर्व अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. तसेच माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लाभार्थी शिधापत्रिकेअभावी धान्यापासून वंचित राहिले असलेबाबत तोंडी अथवा लेखी तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) जव्हार (जि. पालघर) तालुक्यामध्ये माहे डिसेंबर २०२२ अखेर एकूण शिधापत्रिका धारकांची संख्या ३४३३७ आहे. लाभार्थ्यांना प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेंतर्गत एकुण ३४८९०.६१ मे. टन व अंत्योदय अन्न योजनेंतर्गत एकुण ४७९८९.५६ मे. टन अन्नधान्याचे वाटप करण्यात आले आहे.

(३) नवीन, दुय्यम व विभक्त शिधापत्रिका यासाठी तसेच शिधापत्रिकेमध्ये नाव कमी करणे व नाव वाढविणे इत्यादी प्रलंबित अर्ज विहित कालमर्यादेमध्ये निकाली काढणेबाबत शासनपत्र दिनांक १६.०२.२०२३ अन्वये क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंधेरी (पूर्व) चिनॉय व एम.व्ही. एल. यू . कॉलेज येथील पदवी अभ्यासक्रमाच्या अनुदानित तुकड्या (डिव्हिजन) बंद करण्यात आल्याबाबत**

**(२०) ५४९२० (२६-१२-२०२२). श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) चिनॉय व एम.व्ही.एल.यू.कॉलेज येथील पदवी अभ्यासक्रमाच्या अनुदानित तुकड्या (डिव्हिजन) बंद करण्यात आल्यामुळे सुमारे ८००० विद्यार्थ्यांना अनुदानित तुकड्यांमध्ये प्रवेश मिळू शकलेला नाही तसेच त्यांना जादा प्रवेश शुल्क भरावे लागत असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानित तुकड्या (डिव्हिजन) बंद करण्यामागची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२८-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर मधील ४० फ उप कार्यालयातील दक्षता समितीवर नवीन सदस्याची नियुक्ती होण्याबाबत**

**(२१) ५४९८३ (१८-०१-२०२३). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर येथील ४०-फ उप कार्यालयातील दक्षता समितीवर नवीन सदस्याची नियुक्ती करण्यासाठीची नावे अध्यक्ष आणि लोकप्रतिनिधींनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे दिनांक २२/८/२०२२ रोजी वा त्यासुमारास दिली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीवर सदस्यांच्या नियुक्ती संदर्भातील पत्र संबंधितांनी शासनाकडे दिनांक ९/४/२०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापही सदर सदस्याची नियुक्ती न झाल्याने कार्यकर्त्यामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर दक्षता समितीवर तात्काळ नवीन सदस्याची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (२२-०२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३, (४ व (५) दक्षता समिती अध्यक्ष यांनी ४० फ (उप), शिधावाटप कार्यालय, उल्हासनगरच्या दक्षता समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी सदस्यांची नावे संबधित शिधावाटप अधिकारी यांना दि.२५/०२/२०२१ च्या पत्रान्वये कळविली होती. सदर नावे उप नियंत्रक, शिधावाटप, फ परिमंडळ यांनी दिनांक ९/४/२०२१ च्या पत्रान्वये तत्कालिन मा.पालकमंत्री ठाणे, जिल्हा यांच्या शिफारशीकरिता त्यांच्या कार्यालयास पाठविली होती. दरम्यान, शासन निर्णय दि.१४/०९/२०२२ अन्वये राज्यात ग्राम, तालुका, नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या दक्षता समित्यांवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत.

सद्यस्थितीत नव्याने पालकमंत्र्यांच्या नियुक्ती करण्यात आल्या असल्याने शासन निर्णय दि.२५/१०/२०१६ मधील तरतुदींनुसार दक्षता समित्यांवरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**महानिर्मितीने महाराष्ट्र खनिकर्म महामंडळाच्या माध्यमातून कोळसा धुण्याचे काम खाजगी वॉशरीजला देऊन केलेला गैरव्यवहार**

**(२२) ५५००० (२६-१२-२०२२). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानिर्मितीने महाराष्ट्र खनिकर्म महामंडळाच्या माध्यमातून वर्षाला २२ दशलक्ष मेट्रिक टन कोळसा धुण्याचे काम विविध खाजगी वॉशरीजला दिल्याची बाब माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुतलेला कोळसा वापरल्यावर वीज निर्मिती वाढल्याचे कोणतेही शास्त्रीय वा तांत्रिक प्रमाण व पुरावे नसताना देखील महानिर्मितीसाठी कोळसा धुण्याचे काम खाजगी कोल वाशरीजला दिल्याने पाच वर्षात सुमारे २६ हजार कोटींचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोळसा धुताना २५% कोळसा नाकारला जातो व नाकारलेला कोळसा खुल्या बाजारात विकण्याऐवजी महानिर्मिती पुन्हा खाजगी वॉशरीजलाच नाममात्र ४०० रुपये टन दराने हा कोळसा देते जो ते खुल्या बाजारात छुप्या पद्धतीने दहा हजाराहून जास्त भावाने विकून गैरव्यवहार करत असल्याच्या विविध राज्य व केंद्रीय तपासणी यंत्रणांकडे तक्रार करूनही कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

महाजेनकोने १०.१२.२०२० रोजी एम.एस.एम.सी. (Maharashtra State Mining Corporation) सोबत डब्ल्यू.सी.एल, एस.ई.सी.एल. आणि एम.सी.एल. च्या खाणीतून कच्चा कोळसा घेऊन वॉशरीज मध्ये धुतल्यानंतर महाजेनकोच्या विविध विद्युत केंद्रांना प्रती वर्ष २१.७९८ दश लक्ष मेट्रिक टन धुतलेल्या कोळशाचा पुरवठयाचा करार पाच वर्षासाठी केला आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील (३ X ६६० मेगावॅट संच क्र. ८,९,१० ) हे ३७३१ Kcal/Kg च्या उष्मांक मूल्यांवर रचना केलेली असल्यामुळे सदर संचाकरिता नोव्हेंबर, २०२१ पासून १०० टक्के धुतलेला कोळसा वीज निर्मितीसाठी वापरणे सुरु केले आहे व त्या अनुषंगाने औष्णिक विद्युत केंद्रातील उत्पादन क्षमतेवर व इतर रचनात्मक मापदंडावर सुनिश्चितपणे सुधारणा दिसून आलेली आहे. कोळसा धुतल्यानंतरही त्याच्या मापदंडामध्ये सुधारणा झाली नसल्यास कराराच्या आधीन राहत महानिर्मिती विविध दंडनीय कार्यवाही करीत असते.

केंद्र शासनाची संस्था CIMFR ने कोळशाचे ग्रेड सादर केलेल्या विश्लेषण अहवालानंतर मानक उत्पन्न (Normal Yield) निश्चित केले जाते आणि वॉशरी ऑपरेटर निर्दिष्ट Normative Yield (NY) नुसार TPS ला निर्दिष्ट प्रमाणात धुतलेल्या कोळश्याचा पुरवठा करण्यास बांधील आहेत. "कच्चा (Raw) कोळसा आणि NY मधील फरक म्हणजे कोल वॉशरी रीजेक्ट (CWR) शेवटी शिल्लक राहते."

वॉशरीच्या रिजेक्ट कोळशाचे दर प्राप्त करण्याकरिता खनिकर्म महामंडळाव्दारा देश पातळीवर खुल्या निविदेव्दारे कोळसा वॉश करणे व वॉशरीच्या रिजेक्ट कोळशाचे दर मागविण्यात आले. वॉशरी ऑपरेटना कोल वॉशरी रीजेक्टच्या विल्हेवाटीसाठी कोळसा मंत्रालय (MoC) द्वारे प्रसारित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कोल वॉशरी रीजेक्टची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी आहे.

कोल रीजेक्ट विक्रीचे दर स्पर्धात्मक निविदेच्या मार्फत वेकोली ६०० रु. प्रती मे टन आणि एसईसीएल व एमसीएल ३०० रु. प्रती मे टन असे निश्चित करण्यात आलेले आहेत जे इतर राज्यांच्या दरापेक्षा तुलनेने जास्त आहेत व त्यानुसार करारनामा करण्यात आला आहे. वॉशरीच्या कोल रिजेक्ट विक्री मध्ये शासनाचे काहीही नुकसान न करता सर्व प्रक्रीया स्पर्धात्मक निविदेच्या मार्फत करुन वॉशरीज कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच वॉश कोलच्या वापरामुळे महानिर्मितीला वीज निर्मिती मध्ये सुधारणा दिसून येत आहे.
(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यात खोटी आमिषे दाखवून सर्वसामान्य गुंतवणूकदारांची होत असलेली फसवणूकीबाबत**

**(२३) ५५५१८ (२६-१२-२०२२). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडवली बाजार आणि परकीय चलनामध्ये गुंतवणूक केल्यास दरमहा पाच टक्के परतावा प्राप्त होत असल्याची अवाजवी व अशक्यप्राय वित्त योजनेची भुरळ घालून तसेच गुंतवणूकदारांना यामध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन

दिल्यास २ टक्के कमिशनचे आमिष दाखवून एका कंपनीच्या संचालकांनी २१ गुंतवणूकदारांची ४४ लाख ४० हजारांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार ठाणे येथे ऑक्टोबर २०२२ मध्ये उघडकीस आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात गुंतवणूकदारांची संख्या यापेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे व या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधीत दोषींना अटक करून त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१२-२०२२) :** (१) व (२) ठाणे पोलीस आयुक्तालयाअंतर्गत जी. बी. आय. ट्रेड प्रा. लि. कंपनी व कंपनीचे संचालक यांनी आपापसात संगनमत करून अवाजवी व अशक्यप्राय परतव्याचे अमिष दाखवून गुंतवणूकदारांना गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले परंतु विहीत मुदतीत आश्वासित केलेल्या लाभासह परतावा न देता २२ गुंतवणूकदारांची रूपये ४४,४०,०००/- इतक्या रक्कमेची फसवणूक केल्याबाबत प्राप्त फिर्यादीनुसार नौपाडा पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु. र. क्र. २६४/२०२२, भा. दं. वि. कलम ४२०, ४०९, ४०६, ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ मधील कलम ३ अन्वये दि. ०७/१०/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हा पुढील तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी केलेल्या तपासादरम्यान ८६ गुंतवणूकदारांची रूपये २,९३,९१,९००/- इतक्या रकमेची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे.
(३) सदर प्रकरणात सात आरोपी असून दि. ०७/१०/२०२२ रोजी पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.उर्वरीत दोन आरोपी फरार असून त्यांचा शोध घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जॉन्सन ॲन्ड जॉन्सनच्या बेबी पावडरमध्ये अधिक प्रमाणात पीएच आढळल्याबाबत

**(२४) ५६८७१ (२४-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जॉन्सन ॲण्ड जॉन्सन कंपनीने उत्पादन केलेल्या बेबी पावडरमध्ये प्रमाणापेक्षा अधिक पीएच आढळल्याचा अहवाल कलकत्ता येथील केंद्रीय औषध प्रयोगशाळा यांनी दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पावडर लहान बालकांसाठी वापरण्यात येत असून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असल्याने मा.उच्च न्यायालयाने सदर कंपनी ४८ तासाच्या आत बंद करण्याचे आदेश दिनांक २० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास अन्न व प्रशासन विभागाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कंपनीत अद्यापही पावडरचे उत्पादन पूर्ण क्षमतेने चालू आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नव्या नियमांप्रमाणे नमुने घेऊन चाचण्या करण्यात येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच पावडरचा नवीन चाचणीचा अहवाल सादर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१५-०२-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि, केंद्रीय औषध प्रयोगशाळा, कलकत्ता यांच्या अहवालानुसार "जॉन्सन बेबी पावडर" चे नमुने अप्रमाणित सिद्ध झाल्यामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या दि.१५.०९.२०२२ च्या आदेशानुसार Jhonsons Baby Powder चे उत्पादन अनुमती दि.१५.१२.२०२२ पासून रद्द करण्यात आली होती. सदर आदेशाविरूद्ध उत्पादकाने शासनाकडे अपिल दाखल केले होते. शासनाने सदर अपिल नामंजूर केले. उत्पादकाने परवाना प्राधिकारी यांच्या विरूद्ध मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या न्यायालयात याचिका क्र. WPL/३२००४/२०२२ दाखल केली. सदर खटल्यामध्ये उच्च न्यायालयाने शासनाचे व परवाना प्राधिकारी यांचे आदेश रद्द केले आहेत.

(३) हे खरे नाही.

में. जॉन्सन ॲण्ड जॉन्सन प्रा.लि. यांनी स्वत: हून निर्णय घेवून दि.२२.०६.२०२३ रोजी उत्पादन परवाना प्रशासनास प्रत्यार्पित केला आहे व "जॉन्सन बेबी पावडर" या सौंदर्य प्रसाधनाचे उत्पादन महाराष्ट्र राज्यात बंद केले आहे.

(४) व (५) हे खरे आहे.

मा. उच्च न्यायालयाने दि.११.०१.२०२३ रोजीच्या आदेशान्वये उत्पादकास उत्पादनाची अनुमती दिलेली आहे. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार उत्पादकाकडे जाऊन नवीन नमुने घेवून चाचणी व विश्लेषणासाठी

१. Food and Drug Administration, Laboratory. Maharashtra State, Bandra (East),

२. M/s. Intertake India Private Limited, Andheri (East), Mumbai

३. Central Drug Testing Laboratory, West Zone, Mumbai. या प्रयोगशाळांना देण्यात आले होते. प्रयोगशाळांनी त्यांचे अहवाल न्यायालयापुढे सिलबंद लखोट्यांमध्ये सादर केले. सदर अहवालामध्ये Johnson's Baby Power च्या ४ पाठांपैकी एक पाठ अप्रमाणित आढळून आले.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील धान्य दुकानदार आदिवासींची फसवणूक करीत असल्याबाबत

**(२५) ५९०७९ (२४-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील दारिद्र रेषेखालील व दारिद्र रेषेतील आदिवासींना शासनाकडून देण्यात येणाऱ्या धान्यामध्ये संबंधित रेशन धान्य दुकानदार कमी धान्य देऊन त्यांची फसवणूक करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने फसवणुक करणाऱ्या संबधित पुरवठा अधिकारी व रेशनधान्य दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०१-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) श्री.प्रकाश खोडका, तालुका सचिव, शहापूर श्रमजीवी संघटना, महाराष्ट्र यांनी दि.१५.२.२०२३ च्या पत्रान्वये तहसिलदार, शहापूर यांच्याकडे तक्रार केली आहे.

श्री.रावजी लहू भोये, रास्त भाव धान्य दुकानदार, वेहलोंडे, ता.शहापूर, जि.ठाणे यांचे दुकानास जोडलेल्या सापटेवाडा येथील कार्डधारकांना माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२३ चे धान्य वितरण करण्यात आले नाही.

शासन निर्णय क्र.साविव्य १०९१/२४२४/प्र.क्र.६१७८/ना.पु.२८, दि.१२.११.१९९१ मधील तरतुदीनुसार सदर बाब गंभीर स्वरुपाचे दोष असल्योन जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे यांच्या दि.२७.२.२०२३ च्या आदेशान्वये रास्त भाव धान्य दुकान, मौजे वेहलोंडे निलंबित करण्यात आले आहे.

रास्त भाव दुकानदारास आपले म्हणणे मांडण्याची योग्य व पुरेशी संधी देणे आवश्यक असल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे यांच्याकडे दि.९.३.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

सुनावणी दरम्यान रास्त भाव दुकानदाराने त्यांची बाजू सिध्द केली नसल्याने सदरील रास्त भाव दुकान निलंबित ठेवलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राधानगरी (जि.कोल्हापूर) येथे शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय मंजूर करण्याबाबत

**(२६) ५९६६१ (२४-०४-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) येथे शताब्दी महोत्सव २००७-२००८ अंतर्गत शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय मंजूर करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी राधानगरी येथे गायरान जमीन उपलब्ध असल्याबाबतचा प्रस्ताव अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना पत्र क्र.नियो/का.१८/शा.अ.अ./११२९/२००७ दिनांक २३ ऑगस्ट,२००७ रोजी वा त्या सुमारास पाठविण्यात आले हे खरे आहे काय,

(३) तसेच, राधानगरी येथील मंजूर शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी अवसरी खुर्द (ता.आंबेगाव, जि.पुणे), येथे स्थलांतरीत केले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राधानगरी येथील मंजूर झालेले शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय, राधानगरी येथेच नव्याने मंजूर करण्याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व उच्च व तंत्रशिक्षणमंत्री यांचेकडे दिनांक १० नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०३-०८-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

राधानगरी या दुर्गम व मागास भागाचा विचार करुन त्या भागातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी तेथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याबाबत स्थानिक माजी लोकप्रतिनीधी यांनी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना निवेदन केले होते. सदर निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती कोल्हापूर यांनी दि.२२.०८.२००७ च्या पत्रान्वये आवश्यक त्या कार्यवाहीसाठी शासनास सादर केली होती.

(३) हे खरे नाही.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून राज्यात नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास दिलेल्या मान्यतेनुसार शासकीय अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय, अवसरी खुर्द, ता.आंबेगाव, जि.पुणे येथे दि.१५.०६.२००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) कोल्हापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याबाबत दि.२७ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

राधानगरी हे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे कार्यक्षेत्रात असून अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार कोल्हापूर येथील विद्यार्थ्यांप्रमाणेच राधानगरी व त्या परिसरातील विद्यार्थी कोल्हापूर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात मुळ विद्यापीठ (HU- Home University) क्षेत्रासाठी राखीव असलेल्या ७०% जागांसाठी पात्र असल्याने सद्यस्थितीत राधानगरी येथे नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करणे व्यवहार्य ठरत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड औद्योगिक (MIDC) वसाहतीत सुरक्षा धोरण कागदावरच असलेबाबत

**(२७) ६०७४१ (२७-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड औद्योगिक वसाहतीत (MIDC) औद्योगिक सुरक्षेच्या दृष्टीने फारशी काळजी घेतली जात नसल्याने अनेक घटना घडल्या असून मालमत्तेच्या नुकसानासह अनेक कामगारांना आपले प्राण गमावावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगारांच्या सुरक्षेसाठी त्यांना पुरेशी साधने उपलब्ध केली जात असून कंपनीच्या अंतर्गत सुरक्षेची काळजी घेतली जाते काय याची दर वर्षी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातर्फे कंपन्यांचे लेखापरीक्षण केले जाते मात्र याकडे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियोजनबध्द सुरक्षा यंत्रणेचा अभाव असल्याने अनेक प्रकारच्या घटना घडल्या जातात याबाबत औद्योगिक सुरक्षा दक्ष ठेवणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०४-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही,

पिंपरी-चिंचवड औद्योगिक वसाहतीत (MIDC) एकूण ३५६ कारखाने नोंदणीकृत आहेत. सन २०२०पासून दोन कारखान्यामध्ये प्राणघातक अपघाताच्या दोन घटना घडलेल्या आहेत. तसेच एका कारखान्यात इलेक्ट्रिकल पॅनलमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने आगीची घटना घडलेली होती. या आगीच्या घटनेत कोणीही जखमी वा मृत झालेले नाही. सदर प्राणघातक अपघाताची व आगीच्या घटनेची या विभागातर्फे चौकशी करण्यात आलेली आहे.

(२) कामगारांच्या सुरक्षेसाठी व पुरेशी सुरक्षा साधने देण्यासाठी तसेच सुरक्षतेची काळजी घेणेबाबत कारखान्यांना निरीक्षणा दरम्यान सूचना औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातर्फे कारखाना व्यवस्थापनास देण्यात येतात. त्यामुळे कामगारांच्या सुरक्षेसाठी त्यांना पुरेशी साधने कारखाना व्यवस्थापनामार्फत उपलब्ध करुन दिली जातात. कारखान्यांच्या अंतर्गत सुरक्षेची काळजी घेतली जाते. पिंपरी- चिंचवड औद्योगिक वसाहतीतील महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परिक्षण) नियम, २०१४ च्या तरतुदी असलेल्या बहुतांशी कारखान्यांचे शासन मान्यता प्राप्त सुरक्षा लेखा परिक्षकांकडून सुरक्षा लेखा परिक्षण झालेले आहे. तसेच उर्वरीत कारखान्यांबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातर्फे केंद्रीय निरीक्षण प्रणालीनुसार (Centralized Inspection System) कारखान्यांचे निरीक्षण करण्यात येतात. अपघाताच्या घटना घडू नयेत याकरिता रासायनिक कारखान्यात रंगीत तालीम (Mock Drills) घेण्यात येतात. सुरक्षा सप्ताह दरम्यान कामगारांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने जनजागृती होण्याच्या दृष्टीकोनातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याकरिता कारखाना व्यवस्थापनास आवाहन केले जाते. वेळोवेळी कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षिततेकरिता या विभागामार्फत विविध सुरक्षा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हयातील हजारो नवउदयोजकांचे प्रस्ताव नाकारण्यात आल्याबाबत

**(२८) ६२०५२ (२४-०४-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण व शहरी भागात नवीन उदयोजकांनी पुढे येऊन उदयोग-व्यवसाय करावा, या उद्देशाने शासनाने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम हाती घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्हयातील २ हजारहून अधिक नवउदयोजकांनी विविध बँकांकडे कर्जप्रस्ताव सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कार्यक्रमांतर्गत जिल्हयाला किती प्रस्तावांचे लक्ष्य आहे तसेच सादर केलेल्या पैकी किती प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे व किती प्रस्ताव बँकांनी नाकारले आहेत,
(४) असल्यास, सदर प्रस्तावांचे लक्ष्य पूर्ण झाले नसल्यास व बँकांनी प्रस्ताव नाकारले असल्यास त्याची कारणे काय आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्हयात रोजगार निर्मिती होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०२-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात रत्नागिरी जिल्ह्याकरीता ८०० एवढ्या प्रस्तावांचे लक्ष्य निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार बँकांकडे शिफारस केलेल्या २५२८ एवढ्या प्रस्तावांपैकी बँकांनी ४३९ प्रस्तावांना मंजूरी दिली असून १८०२ प्रस्ताव नामंजूर केले आहेत. उर्वरीत २८७ प्रस्ताव बँकेकडे प्रलंबित आहेत.
(४) बँकांनी प्रस्ताव नाकारताना दिलेल्या कारणांमध्ये प्रतिकूल सिबिल स्कोर, प्रकल्पाची अव्यवहार्यता, अपूर्ण कागदपत्रे, अर्जदाराने बँकेकडे पाठ फिरवणे/ अर्जदाराकडून प्रतिसाद न मिळणे इत्यादी बाबी नमूद केल्या आहेत.
(५) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यात ३५१२ रोजगार निर्मिती झाली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील केंद्र सरकारचा राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प कोरोना महामारीनंतर दोन वर्षापासून बंद करण्यात आल्याबाबत**

**(२९) ६३४२६ (२७-०४-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील केंद्र शासनाच्या राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प कोरोना महामारीनंतर दोन वर्षापासून बंद करण्यात आल्याने शहापूर, मुरबाड, कल्याण, भिवंडी व अंबरनाथ तालुक्यातील आर्थिक दुर्बल घटकांची तसेच रोजगार मिळण्यासाठी व हंगामी स्थलांतरीत होणाऱ्यांची मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या माध्यमातून प्रत्येक केंद्रासाठी दोन शिक्षक निर्देशक, एक लिपिक, एक शिपाई नेमण्यात आले होते, प्रत्येकी तीन केंद्रासाठी एक व्यवसाय निर्देशक नेमण्यात आला असून प्रकल्प बंद केल्याने हे सर्व कर्मचारी बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यात वीट भट्टीवर काम करणाऱ्या कुटुंबातील अनेक मुले शिक्षणापासून वंचित असून त्यांना पुन:श्च वीटा तयार करण्याचे काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकल्प सुरू करून निधी उपलब्ध करुन द्यावा तसेच बालकामगारांना शिक्षणाच्या प्रवाहात आणावे अशी मागणी बालकामगार प्रकल्पग्रस्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०४-१२-२०२३) :** (१) व (२) केंद्र शासनाने दि.३१.०३.२०२१ पासून राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प हा राज्यातील समग्र शिक्षा अभियान या शिक्षण विभागाच्या योजनेमध्ये समाविष्ठ करण्यात आलेला असल्याने राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प बंद करण्यात आलेला असून सर्व योजना समग्र शिक्षा अभियान योजनेअंतर्गत कार्यान्वीत

करण्यात आलेल्या आहेत. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प अंतर्गत चालविण्यात येणा-या विशेष प्रशिक्षण केंद्रे ही अशासकीय सामाजिक संस्था (NGO) मार्फत चालविली जात होती. त्यामध्ये कर्मचारी नियुक्ती सदर संस्थांमार्फत केली जात होती व त्यांना देण्यात येणारे मानधन हे सन २०१७ पूर्वी राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पाकडून अशासकीय सामाजिक संस्था यांना देण्यात येत होते. २०१७ नंतर केंद्र शासनाच्या सूचनेनूसार सदरचे मानधन सामाजिक संस्थांमार्फत न देता सरळ संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या बँक खात्यावर राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प मार्फत देण्यात येत होते. तसेच राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प समग्र शिक्षा अभियानामध्ये अंतर्भूत करतेवेळी कोणत्याही कर्मचा-याचे मानधन प्रलंबित नव्हते.

(३), (४) व (५) ठाणे जिल्हयामध्ये सन २००५ पासून राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प चालू करण्यात आला होता. सदर प्रकल्पामार्फत चालविण्यात येणारे विशेष प्रशिक्षण केंद्र हे बारमाही स्वरुपाचे होते. विटभट्टी हा उद्योग हंगामी असल्याने राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पाच्या विशेष प्रशिक्षण केंद्रामध्ये विटभट्टीवरील मुलांचा समावेश करण्यात आला नव्हता. तथापि,समग्र शिक्षा अभियान योजनेअंतर्गत विटभट्टीत काम करणा-या मुलांचा देखील समावेश असल्याने त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आलेले नाही.तसेच राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प केंद्र शासनाने समग्र शिक्षा अभियनामध्ये अंतर्भूत करुन सदर अभियानामध्ये बाल कामगारांच्या शिक्षणाची देखील व्यवस्था केलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पदवी अभ्यासक्रम सुरु करणेबाबत

**(३०) ६४३१० (२७-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० नुसार ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम माहे जून,२०२३ पासून सुरु करण्याचे शासनाने जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्या रचनेनुसार पदवीसाठीच्या अभ्यासक्रमाचा आराखडा प्रशासनाने अद्याप तयार केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदरील आराखडा तातडीने तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१२-०६-२०२३) :** (१), (२) व (३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या धोरणाचा अभ्यास करून शासनास अहवाल सादर करण्यासाठी डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी महासंचालक, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट गठीत केला होता. त्यांनी सादर केलेला अहवाल शासनाने स्वीकृत केला असून अहवालातील शिफारसीनुसार मंत्रीमंडळ बैठकीतील मान्यतेनुसार विषयनिहाय उपसमित्या गठीत केल्या होत्या. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत सुरु असलेल्या ३ वर्षाच्या अभ्यासक्रमावरुन ४ वर्षाच्या अभ्यासक्रमाकडे स्थलांतराचा आराखडा, एकसमान बहुविद्याशाखीय शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा, सामान्य अध्यापशास्त्राऐवजी विधायक अध्यापनशास्त्राचा आराखडा आणि विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिकृत शिक्षणाचा आराखडा यांचे अंमलबजावणीबाबत डॉ. रविंद्र कुलकर्णी, माजी प्र- कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने सादर केलेल्या शिफारसी शासनाने स्वीकारल्या असून शासन पत्र २०.१०.२०२२ अन्वये सर्व अकृषि विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वायत्त विद्यापीठे, समूह विद्यापीठे यांना या शिफारसीसंदर्भात विद्यापीठाच्या विहित प्राधिकरणांची मान्यता घेऊन अंमलबजावणी करण्याबाबत कळविले आहे तसेच सदर शिफारसींच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शासन निर्णय दि.०६.१२.२०२२ अन्वये निदेश निर्गमित करण्यात आले आहेत. याशिवाय उपसमितींच्या शिफारसीच्या अंमलबजावणी संदर्भात आढावा

घेऊन येणाऱ्या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी शासन निर्णय दि.२६.१२.२०२२ अन्वये सुकाणू समिती गठीत करण्यात आली आहे. सुकाणू समितीच्या शिफारसीनुसार अभ्यासक्रम आणि श्रेयांक आराखड्याबाबत शासन निर्णय दि. २०.०४.२०२३ व दि.१६.०५.२०२३ अन्वये निदेश निर्गमित करण्यात आले असून त्यानुसार विद्यापीठ स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात उत्पादक स्थिरता व चाचणी प्रमाणपत्राशिवाय औषध उत्पादन होत असल्याबाबत**

**(३१) ६५१०१ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये अनेक औषधांचे उत्पादक स्थिरता व चाचणी प्रमाणत्राशिवाय उत्पादन होत असल्याने या औषधांची परदेशामध्ये होणारी निर्यात थांबविण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परदेशात होणारी निर्यात थांबविण्यात आली असली तरी सदोष औषधांमुळे टांझानिया सारख्या देशामध्ये लहान मुलांवर त्याचा विपरीत परिणाम झाल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदोष औषधांची निर्यात विनाचाचण्या केली जाऊ नये यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून त्वरीत समिती स्थापन करण्यात येईल अशी घोषणा अन्न व औषध प्रशासन मंत्री यांनी करून देखील अद्यापही त्याची पुर्तता झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निर्यात होणाऱ्या औषधांची गुणवत्ता राखण्यासाठी तसेच परवान्यासह स्थिरता चाचणी प्रमाणपत्र न घेता औषधे तयार करणाऱ्या कंपन्याविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०१-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उदभवत नाही.
(३) हे खरे नाही.
सदोष औषधांची निर्यात विनाचाचण्या केली जाऊ नये यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून त्वरीत समिती स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा मा. मंत्री, अन्न व औषध प्रशासन यांनी केली नाही.
(४) सदर बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यातील नियमबाहय काम करणाऱ्या पॅथलॅबवर कारवाई करणेबाबत**

**(३२) ६५९२८ (२८-०८-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विभागात शासनाने केलेल्या पाहणीत काही रक्तपेढया रक्त कोल्ड चेन न राखणे किंवा रक्त संक्रमण अधिकाऱ्यांशिवाय कामे करणे यासारख्या नियमांचे उल्लघंन करीत असल्याचे निदर्शनास आले असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील नियमबाहय काम करणा-या रक्त पेढयावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१०-०१-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) अन्न व औषध प्रशासनाद्वारे औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत नियम, १९४५ मधील तरतूदीनुसार रक्त केंद्राची नियमित तपासणी केली जाते. ज्या रक्त केंद्रामध्ये रक्त संक्रमण अधिकारी यांच्या गैरहजेरीत रक्त संकलन करण्यात आले अथवा योग्य तापमान साठवण न केल्याचे लक्षात आले व इतर उल्लंघन केल्याचे आढळून आले, अशा रक्त केंद्राविरुध्द उक्त कायद्यानुसार कारवाई केली जाते.

सन २०२२ व २०२३ या कालावधीत अन्न व औषध प्रशासनाद्वारे एकूण ३८२ रक्त पेढ्यांची तपासणी करण्यात आली असून ०३ रक्त पेढ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली असूण ०२ रक्त पेढ्यांचा परवाना रद्द केला आहे. तसेच ०२ रक्त पेढ्यांना ताकीद देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## बेरोजगारी राज्यात वाढत असल्याबाबत

**(३३) ६६३०१ (२५-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील तीन महिन्यात रोजगारांच्या संधीवर परिणाम झालेला असून बेरोजगारीचा दर सातत्याने वाढत असून शहरी भागात ८.४ टक्के तर ग्रामीण भागात ७.५ टक्क्यावर आला असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेरोजगारांपैकी अनुभवी तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याचे प्रमाण कमी झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुषंगाने शासनाने राज्यातील बेरोजगारीचा आढावा घेऊन बेरोजगारांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२९-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

मार्च २०२३ मध्ये राज्यातील बेरोजगारीचा दर ५.५ टक्के असल्याचे (Centre for Monitoring Indian Economy-सीएमआयई) या संकेतस्थळावरील माहितीनुसार दिसून येते.

(२) महास्वयम या शासनाच्या वेब पोर्टलवर राज्यातील नोंदणीकृत उमेदवार व सर्व मार्गाने नोकरीस लागलेले उमेदवार यांची मागील ३ वर्षांची माहिती खालील प्रमाणे आहे:-

वर्ष नोंदणीकृत उमेदवार सर्व मार्गाने नोकरीस लागलेल्या उमेदवारांची संख्या टक्केवारी (%) २०२० ५,७५,१२३ १,९९,४८६ ३४.६८ २०२१ ४,९३,५९३ २,१९,१५६ ४४.४० २०२२ ४,८७,३५८ २,४८,९५० ५१.०८ २०२३ (सप्टेंबर अखेर) ४,५०,८२८ १,४०,११० ३१.०७

(३) बेरोजगारीची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबवून उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. सदर योजनांद्वारे सन २०२०, २०२१, २०२२ व २०२३ (सप्टेंबर अखेर) अनुक्रमे सुमारे १.९९ लाख, २.१९ लाख, २.४९ लाख व १.४० लाख अशा एकूण ८.०७ लाख उमेदवारांना नोकरी प्राप्त झाली आहे.

बेरोजगार उमेदवारांना बेरोजगार भत्ता देण्याऐवजी कौशल्य प्रशिक्षणासह रोजगार सक्षम करुन जागतिक बाजारपेठेत रोजगार उपलब्ध होईल यादृष्टीने शासन सदैव प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील विविध विकास कामे मंजूर करण्यासाठी प्रधानमंत्री जन विकास योजनेअंतर्गत सुधारित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत

**(३४) ६६६०८ (३१-०८-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी प्रधानमंत्री जन विकास योजने अंतर्गत प्रस्तावित केलेली कामे, जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय व जिल्ह्यातील इतर संबंधित यंत्रणेने तातडीने त्या कामाचे सुधारित प्रस्ताव करुन शासनाकडे पाठविण्याबाबत अमरावती जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन सूचित केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी अद्याप कार्यवाही झालेली नसल्याने सदर प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वरील कामे तातडीने मंजूर करण्यासंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०१-१२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी, अमरावती यांनी एकूण ३८१ कामांचे प्रस्ताव सादर केले असता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सुधारीत प्रस्ताव सादर करावेत अश्या सूचना जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या होत्या त्यानुसार १८९ सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले असून सदर प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही सूरू आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रंथालयांना वार्षिक अंकेक्षण अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याबाबत

**(३५) ६६९६० (२८-०८-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील १५ ग्रंथालयांना वार्षिक अंकेक्षण अहवाल सादर करण्याचे निर्देश देऊनही सदर अहवाल सादर केला नसल्याने ग्रंथालय संचालनालयानी अकार्यक्षम ठरवुन मान्यता रद्द केल्याबाबत माहे मे,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यात एकुण १६८ शासनमान्य (अ श्रेणी-०३,'ब'श्रेणी-१३,'क'श्रेणी-६९ व 'ड'श्रेणी-८३) चे ग्रंथालय असुन शासनाच्या माहे डिसेंबर, २०२२ च्या शासन निर्णयानुसार ग्रंथालय अनुदानात ६० टक्के वाढ करण्यात आली असुन 'अ'श्रेणीसाठी ४ लाख ६० हजार ८०० रुपये, 'ब' श्रेणीसाठी ३ लाख ७ हजार रुपये, 'क' श्रेणीसाठी ५३ हजार ६०० रुपये, तर 'ड' श्रेणीसाठी ४८ हजार रुपये वार्षिक अनुदान देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त १५ ग्रंथालयाची मान्यता रद्द केल्यास चंद्रपूर जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे ग्रामीण भागात स्थापित ग्रंथालयात अभ्यास करणारे युवक अभ्यासिकेपासुन वंचित रहाणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,जिल्ह्यातील युवकांचे भवितव्य लक्षात घेता,१५ ग्रंथालयाचे वार्षिक अंकेक्षण अहवाल ग्रंथालय संचालनालयाचा दिशानिर्देशानुसार सादर केल्यास किंवा दिलेल्या नियमांचे पालन केल्यास पुनश्च मंजुरी देणार आहे काय, तसेच मान्यता रद्द केलेल्या ग्रंथालयाचे दायीत्व इतर संस्थास बहाल करण्याचे नियोजन करण्यात आले आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) चंद्रपूर जिल्ह्यातील १६८ ग्रंथालयांपैकी १५ ग्रंथालयांची मान्यता रद्द झाल्याने सद्य:स्थितीत एकूण १५३ ग्रंथालये कार्यरत आहेत.

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे परिरक्षण अनुदानात दिनांक २१ डिसेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये ६० टक्के वाढ करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सद्य:स्थितीत १५३ शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत असून त्याद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यासिका व इतर ग्रंथालयीन सेवा मिळत आहेत.

(४) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ व महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री अनुदाने यासाठी मान्यता) नियम, १९७० अन्वये चंद्रपूर जिल्ह्यातील १५ अकार्यक्षम ग्रंथालयाची मान्यता रद्द करण्यात आली आहे. सदर आदेशाविरुध्द राज्य शासनाकडे अपील करण्याची नियमात तरतूद आहे.

मान्यता रद्द केलेल्या ग्रंथालयाचे दायीत्व इतर संस्थेस बहाल करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये नियम, १९७० मध्ये तरतूद नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना बेरोजगार भत्ता देणेबाबत

**(३६) ६७८६७ (२५-०८-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार भत्ता देण्याची योजना सन २०२० पासून घोषणा करण्यात आली असून त्यांची अंमलबजावणी झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेनुसार सुशिक्षीत बेरोजगारांना प्रतिमाह रु. ५०००/- इतका महागाई भत्ता देण्याबाबत घोषणा करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अमरावती जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगारांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून १० ते १२ वी शिक्षण घेतलेल्यांना दरमहा ८ हजार तर पदवीधारांना १० हजार बेरोजगार भत्ता देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्-नुषंगाने राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना बेरोजगार भत्ता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२९-१२-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

सन २०२० मध्ये या प्रकारची घोषणा केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) संयुक्त रोजगार आंदोलन समिती या संघटनेमार्फत दि. २६.११.२०२२ रोजी बेरोजगार भत्ता देणे व इतर मागण्यांसाठी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले.

(४) बेरोजगारीची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबवून उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. सदर योजनांद्वारे सन २०२०, २०२१, २०२२ व २०२३ (सप्टेंबर अखेर) अनुक्रमे सुमारे १.९९ लाख, २.१९ लाख, २.४९ लाख व १.४० लाख अशा एकूण ८.०७ लाख उमेदवारांना नोकरी प्राप्त झाली आहे.

बेरोजगार उमेदवारांना बेरोजगार भत्ता देण्याऐवजी कौशल्य प्रशिक्षणासह रोजगार सक्षम करुन जागतिक बाजारपेठेत रोजगार उपलब्ध होईल यादृष्टीने शासन सदैव प्रयत्नशील आहे. त्यामुळे राज्यातील बेरोजगारांना "बेरोजगारी भत्ता" देण्याबाबत कोणताही प्रस्ताव सद्यस्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ग्रंथालयासाठी स्वतंत्र धोरण राबविण्याबाबत**

**(३७) ६८८८० (२८-०८-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ग्रंथालयासाठी स्वतंत्र धोरण नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रंथ प्रकाशकांसाठी, ग्रंथ व्यावसायिकांसाठी, लेखन वाचन उत्तेजनासाठी तसेच स्वतंत्र धोरण अवलंबिण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१०-११-२०२३) :** (१) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, १९६७ व नियम १९७० अन्वये करण्यात येत असलेले राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे नियमन (स्थापना, परिरक्षण, संघटन, नियोजन आणि विकास ) हे कार्य ग्रंथालय संचालनालयामार्फत केले जाते.
(२) महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण-२०१० अंतर्गत ग्रंथप्रेमींना विविध ग्रंथांची खरेदी एकाच ठिकाणी करता यावी तसेच प्रकाशक व ग्रंथविक्रेता यांना एकाच ठिकाणी आवश्यक ती सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रतिवर्षी जिल्हास्तरावर ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

तसेच राज्यातील अ वर्ग ३३० शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना त्यांच्या आवारात स्वत: किंवा प्रकाशक / ग्रंथ विक्रेता यांना नवीन ग्रंथ विक्री करण्यास परवानगी देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात औषध निरीक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(३८) ७१४३१ (३१-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात औषध निरीक्षकांची (Drug Inspector) सुमारे ११७ पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यातील ८७ पदांच्या भरतीची जाहिरात प्रसिध्द केल्यानंतर सदर भरती प्रक्रिया स्थगित केली गेली असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर भरती प्रक्रिया अद्याप राबवली गेली नसल्याचे माहे एप्रिल,२०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त औषध निरीक्षकांच्या पदभरतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (१४-०२-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) खरे आहे.
(४) औषध निरीक्षक पदाचे सुधारीत सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु होती. तद्अनुषंगाने शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार औषध निरीक्षक पदाचे सुधारीत सेवाप्रवेश नियम दि.१५.०१.२०२४ रोजी राजपत्रात

प्रसिध्द करण्यात आले आहेत. सदरहु सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार औषध निरीक्षक पदाच्या पदभरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास नव्याने मागणीपत्र सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात गाव तिथे ग्रंथालय उपक्रम राबविणेबाबत

**(३९) ७१६२४ (०९-०२-२०२४). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ४३ हजार गावांपैकी केवळ १२ हजार गावांमध्येच गाव तिथे ग्रंथालय या शासनाच्या उपक्रमात ग्रंथालय कार्यरत असून सुमारे ३१ हजार गावे ग्रंथालयापासून वंचित असल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गाव तिथे ग्रंथालय हा उपक्रम राबविला गेला तर गावातील गरीब, वंचित, महिला इत्यादी व होतकरू विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गाव तिथे ग्रंथालय उपक्रम ही योजना संपूर्ण राज्यात राबवण्याचे आदेश मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू उपक्रमाची अंमलबजावणी झालेली नसून अनेक ग्रामपंचायती यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, गाव तिथे ग्रंथालय हा उपक्रम यशस्वीरित्या राबवण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२३-०२-२०२४) :** (१) हे अंशतः खरे आहे.
गाव तिथे ग्रंथालय योजना नसून संकल्पना आहे. तसेच, राज्यात ३१ मार्च, २०२३ अखेर ग्रामीण व शहरी भागात मिळून ११,३२२ एवढी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आहेत.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहायक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री अनुदाने यासाठी मान्यता), नियम १९७० याप्रमाणे नवीन ग्रंथालयांना मान्यता, अनुदान देणे व वर्ग/दर्जा बदल करण्याची कार्यवाही करण्यात येते. तथापि, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय दि.२२.०३.२०१३ आणि दि.०७.०६.२०१४ अन्वये नवीन सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता देण्याची प्रक्रिया सन २०१२-१३ पासून स्थगित करण्यात आली आहे.
मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी राज्यातील ज्या गावांमध्ये सार्वजनिक ग्रंथालये नाहीत अशा गावांची माहिती घेऊन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार, ग्रंथालय संचालनालयाकडून आर्थिक भारासह अहवाल सादर करण्यात आला असून त्याची तपासणी करण्याचे काम चालू आहे.

---

## राज्यात विशेषत: मुंबई, पुण्यासह प्रमुख शहरांमध्ये सायबर गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(४०) ७१६८५ (१०-१२-२०२३). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा**

**धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), ॲड.राहूल कुल (दौंड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र सायबर गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून ग्राहकांची यातून आर्थिक फसवणूक होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात विशेषत: ओटीपी, डिजीटल मार्केटिंग, टेलिग्राम टास्क, नोकरी देणे, ऑनलाईन खरेदी, खोटे संकेतस्थळ, अश्लिल पोस्ट, मॉर्फिंग, विमा पॉलिसी, सेक्सटॉर्शन, ऑनलाईन बँकींग व्यवहार, क्रेडिट व डेबीट कार्ड, लोन ॲप, लाईट बिल, एनीटेक्स, क्रिप्टो ट्रेडिंग अशा अनेक माध्यमातून ही फसवणूक होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सायबर गुन्ह्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे क्विक हिलच्या सेक्युराईट लॅब्सच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यभरात अशाप्रकारचे हजारो गुन्हे घडत असतानाही त्याची नोंद, तपास व निकाल यामध्ये मोठ्या प्रमाणात विलंब होत असून हे गुन्हे तातडीने निकाली काढून दोषींना शिक्षा करण्याचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सायबर गुन्ह्यांचे गुंतागुंतीचे स्वरुप पाहता त्याचा तपास करण्यासाठी आवश्यक असणारी आधुनिक यंत्रणा, साधने व तपास तज्ञ यांच्या अपुऱ्या संख्येमुळे हे गुन्ह्यांची उकल होण्यास अमर्याद विलंब लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपुर्ण प्रकरणांची चौकशी करुन या गुन्ह्यामध्ये बाधित व्यक्तींना संरक्षण देऊन दोषींवर तातडीने कारवाई करणेसंदर्भात तसेच सायबर गुन्ह्यांची प्रकरणे तातडीने निकाली निघण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा व जलदगती न्यायालये निर्माण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१२-२०२३) :** (१) राज्यात ऑक्टोंबर-२०२३ पर्यंत ग्राहकांची आर्थिक फसवणूक होत असल्याबाबात एकूण ५५४१ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यापैकी ३६८ उघड गुन्हे असून ४४४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सायबर गुन्ह्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबतचा क्विक हिलच्या सेक्युराईट लॅब्सचा अहवाल हा तांत्रिक बाबीवर अंवलबुन असतो .सायबर गुन्ह्यासंदर्भात ऑक्टोबर २०२३ अखेर  एकूण ६९६१ इतके गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी ११८३ उघड गुन्हे असून १०५८ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) व (६)

१) राज्यात सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता एकुण ४८  सायबर पोलीस ठाणी कार्यान्वित झाली आहेत.

२)  सायबर फसवणूकीच्या तक्रारीची तात्काळ नोंद घेण्याकरीता शासनाकडून १९३० हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असून सायबर फ्रॉडची ऑनलाईन तक्रार नोंदवण्याकरीता www.cybercrime.gov.in ही National

Cyber Reporting Portal (NCCRP) उपलब्ध करून देण्यात आली आहे.
३) सायबर गुन्ह्याची उकल करण्यासाठी Universal Forensics Extraction Device (UFED)४PC,अशा विविध Software Tools उपलब्ध करून देण्यात आले आहे.
४) Social Media Monitoring करीता Defence Research and Development Organisation (DRDO)ने विकसित केलेले Monitoring Software वापरण्यात येते.
५) सायबर गुन्हे विरुद्ध तातडीने उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनामार्फत गृह विभागातील विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्पांतर्गत "सायबर सुरक्षा प्रकल्प " राबविण्यास दि.२७.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.तसेच सायबर सुरक्षा प्रकल्पाचा एकूण कालावधी ५.५ वर्ष इतका असून त्यासाठी रू.८३७.८६ कोटी इतका खर्च प्रस्तावित आहे.सदर प्रकल्पाची अंमलबजावणी विशेष पोलीस महानिरीक्षक,सायबर,मुंबई यांच्या मार्फत करण्यात येणार आहे.
६) सायबर पोलीस ठाणेतील तसेच जिल्ह्यातील पोलीस ठाणेतील तपास अधिकारी व अंमलदार यांना सायबर गुन्हयाच्या तांत्रीक तपासाबाबत महाराष्ट्र सायबर यांचेकडून प्रशिक्षण देण्यात येत आहे.
७) सायबर गुन्हयांबाबत समाजामध्ये जनजागृती करण्याकरीता सायबर पोलीस ठाणेमार्फत जिल्हयातील शाळा, महाविदयालये, शासकीय संस्था, ऑफीसेस, रेडीओ, आकाशवाणी येथे "सायबर अवेअरनेस" चे कार्यक्रम घेण्यात येतात.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात औषधांचे दुकान वा घाऊक औषधांची विक्री करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने एक्सएलएन पोर्टल उपलब्ध करुन दिल्याबाबत

**(४१) ७१७८३ (०८-०२-२०२४). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात औषधांचे दुकान वा घाऊक औषधांची विक्री करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने एक्सएलएन पोर्टल उपलब्ध करुन दिले असून या सुविधेचा लाभ अर्जदारांना त्वरित मिळत नसल्याने याचा फायदा दलाल घेत असल्याची बाब दिनांक १६ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास ठाणे, मुंबई येथे सुमारे ३ हजार ३२० रुपयांत परवान्यांची उपलब्धता होणे आवश्यक असतानाही दलालांमार्फत साठ हजार ते एक लाख रुपये घेतले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांविरुध्द उचित कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (२९-०४-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.
महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात "मेडिकल परवान्यातून कमाई" या मथळयाखाली बातमी प्रकाशित झाली होती.
(२) औषध उत्पादन व विक्री परवाने मंजूरी व इतर परवानगी/प्रमाणपत्र मंजूरीसाठी अन्न व औषध प्रशासनाने fdamfg.maharashtra.gov.in या संगणकीय आज्ञावलीचा वापर सन २०१२ पासून सुरु केला आहे. सदर प्रणालीवर अर्जदार ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करतात. सदर अर्जाची पडताळणी करून अर्ज ऑनलाईन पध्दतीने निकाली काढले जातात. सदरची प्रक्रिया ही संपूर्णत: ऑनलाईन पध्दतीने असून कालमर्यादेत अर्जाचा निपटारा करण्यात येत आहे.
सदर परवाने मंजूरीसाठी दलालांमार्फत रकमा स्विकारल्यात येत असल्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**खारटन रोड (जि.ठाणे) येथील बीएसयुपी योजनेअंतर्गत जुन्या चाळीच्या पुनर्वसन योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(४२) ७२५१२ (१०-१२-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील खारटन रोड येथील, रामंदिर आणि साईनाथ या दोन चाळींच्या पुनर्वसन योजनेत बेसीक सर्व्हिसेस फॉर अर्बन पुअर (बीएसयुपी) या योजनेअंतर्गत बांधलेल्या घरांमध्ये ठाणे महापालिकेचे अधिकारी आणि सोसायटीचे पदाधिकारी यांनी आर्थिक संगनमत करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे १२ अपात्र लाभार्थ्यांची नावे बेकायदेशीररित्या समाविष्ट करुन कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ठाणे नगर पोलीस ठाण्यामध्ये दि.०८ ऑक्टोबर, २०२३ रोजी २४ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदेशीररित्या वितरीत झालेल्या सदनिका मुळ लाभार्थ्यांना परत मिळणेबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२३) :** (१) सदर प्रकरणी २४ आरोपींनी आपापसात संगनमत करुन ठाणे महानगरपालिकेमध्ये बी.एस.यु.पी. योजने अंतर्गत गैरलाभाने सदनिका मिळविण्याकरिता वास्तु व वास्तव्याची खोटी कागदपत्रे सादर करुन ठाणे महानगरपालिकेची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २१३/२०२३, कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, ३४ भा.द.वि. अन्वये, दि.०४.१०.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी बी.एस.यु.पी. योजने अंतर्गत वाटप झालेल्या सदनिकांबाबतच्या कागदपत्रांची माहिती प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही पोलीसांकडून सुरु असून या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे,

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**वाई वर्दडा (ता.मुदखेड, जि.नांदेड) चिंचलवाड येथील खाजगी सावकाराने शेतकऱ्याची जमीन बळकावल्याबाबत**

**(४३) ७२६२५ (११-१२-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाई वर्दडा (ता.मुदखेड, जि.नांदेड) चिंचलवाड येथील खाजगी सावकाराने श्री.बालाजी चंचूलवाड या शेतक-याची जमीन बळकवल्याचे माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी सावकाराविरुध्द गुन्हा दाखल करुन कोणती कारवाई केली तसेच पिडीत शेतक-यांची जमीन परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही. सदर प्रकरणी माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान पोलीसांकडे कोणत्याही स्वरुपात रास्त तक्रार करण्यात आली नव्हती. सदरची बाब सोशल मिडीयाच्या माध्यमातून निदर्शनास आल्याने सदर प्रकरणाची पोलीसांकडून दखल घेण्यात आली होती.

(२) होय. सदर प्रकरणी पोलीसांकडून चौकशी करण्यात आली असता गैरअर्जदार यांच्या विरुद्ध कोणताही गुन्हा दाखल करावयाचा नाही असे श्रीमती सत्यभामाबाई चुंचलवाड यांनी पोलीसांना जबाब दिला आहे. तसेच शेतजमिनीच्या अनुषंगाने गैरअर्जदार राहूल चोंदत्ते व इतर व्यक्तींसोबतच्या वादाच्या अनुषंगाने बैठक होऊन गैरसमज दूर झाला असून

कोणाही विरुद्ध काही तक्रार नसल्याचे चौकशी दरम्यान श्रीमती चुंचलवाड यांनी दि.२९.११.२०२३ रोजी महिला सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन मुदखेड, जि. नांदेड यांच्याकडे जबाब दिला आहे. महसूल अभिलेखानुसार सदर जमिन सध्या बालाजी चंचूलवाड या शेतकऱ्याच्याच ताब्यात आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर, नाशिक व अमरावती अशा सहा ठिकाणी सुरु करण्यात आलेल्या 'भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्राबाबत'**

**(४४) ७२७११ (१३-०२-२०२४). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर, नाशिक आणि अमरावती येथे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये मराठीचे प्रमाण वाढविण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू सहा प्रशिक्षण केंद्रातील संचालक पदी कायमस्वरुपी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याऐवजी शासनातर्फे प्रभारी अधिकाऱ्यांकडे केंद्रांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रशिक्षण केंद्रांना शासनाकडून कायम विलंबाने अनुदान अदा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रशिक्षण केंद्रातील कर्मचाऱ्यांची संख्या देखील अपुरी असल्यामुळे भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रात कायमस्वरुपी संचालक नेमण्यासह पुरेसे कर्मचारी आणि निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२७-०२-२०२४) :** (१) होय.
केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या आय.ए.एस.,आय.पी.एस. यासारख्या स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राज्यातील विद्यार्थ्यांचे यशाचे प्रमाण वाढावे यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नाशिक आणि अमरावती येथे भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत.
(२), (३) व (४) सद्य:स्थितीत भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्र, अमरावती व राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई येथे कायमस्वरुपात नियमित संचालक पद भरण्यात आलेले असून नागपूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर व नाशिक येथील संचालक पदाचा कार्यभार प्रभारी स्वरुपात सोपविण्यात आला आहे. सदरहु सर्व प्रशिक्षण केंद्रांना आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
एकूण ०६ प्रशिक्षण केंद्रापैकी ०२ प्रशिक्षण केंद्रात संचालक पद कायमस्वरुपी भरण्यात आले असून उर्वरित ०४ प्रशिक्षण केंद्रातील संचालक पद भरणेबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहीरात प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच अधिक्षक गट-ब संवर्गातील पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. लिपीक संवर्गातील पदभरतीबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजूरा (जि.चंद्रपूर) तालुक्यात रेशन दुकानदाराने 'प्लास्टिक तांदूळ' वितरित केल्याबाबत**

**(४५) ७२९८० (१४-०२-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूरा (जि.चंद्रपूर) तालुक्यात रेशन दुकानदारांकडून वितरित करण्यात आलेल्या तांदळामध्ये काही तांदुळ पांढरे शुभ्र व पाण्यात तरंगणारे 'प्लास्टिक तांदूळ' वितरित करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (११-०३-२०२४) :** (१) व (२) नाही, माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने पुरवठा निरिक्षक, राजूरा यांनी राजुरा शहरातील ६ रास्तभाव दुकानांना भेट देवून चौकशी केली असता असे आढळून आले की, माहे सप्टेंबर २०२३ मध्ये रास्तभाव दुकानातून वितरीत करण्यात आलेला तांदूळ हा प्लास्टिक युक्त नसून "फोर्टिफाईड" तांदूळ आहे. त्यातील "फोर्टिफाईड राईस कर्नल" (FRK) चे दाणे पाण्यावर तरंगतात. याबाबत राजुरा तालुक्यातील शिधापत्रिका धारकांमध्ये जनजागृती करण्यासाठी रास्तभाव दुकानात फलक लावण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुधगाव (ता.मिरज जि.सांगली) येथे ऊसतोड मजूर पुरविण्याचे आमिष दाखवून शेतकऱ्यांना फसविल्याबाबत**

**(४६) ७३२४८ (१०-१२-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुधगाव (ता.मिरज, जि.सांगली) येथे ऊसतोड मजूर पुरविण्याचे आमिष दाखवून शेतक-यांना लाखो रुपयांना फसविल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेच्या अनुषंगाने फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सांगली ग्रामीण पोलीस ठाणे, सांगली येथे गु.र.न. २५८/२०२३ भा.द.वि. कलम ४०६, ४२० प्रमाणे दि.०८.०८.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी फिर्यादी यांनी नोंदवलेल्या गुन्हांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने साक्षीदार तपासणी झाली असून पुरावे प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही पोलीस विभागाकडून सुरू आहे. सदर गुन्ह्याचा सखोल तपास पोलीसांकडून करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नीन्यु आणि ओल्ड ए.सी. (एअर कंडीशनर) स्टॉक नावाचा बनावट व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करून केलेली आर्थिक फसवणूक**

**(४७) ७३४०४ (१०-१२-२०२३). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा),**

**श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्यु आणि ओल्ड ए.सी. (एअर कंडीशनर) स्टॉक नावाचा बनावट व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करून श्विकी श्रावणकर, यवतमाळ यांनी दररोज अनेक ए.सी. खरेदी विक्री केल्याची खोटी माहिती ग्रुपवर देऊन आणि प्रलोभन दाखवून तसेच बनावट दस्तऐवज तयार करून डीलर रेटने इलेक्ट्रॉनिक उत्पादने उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली विदर्भातील अनेक तरूणांची लाखो रूपयांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ रोजी मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, पोलीस महानिरीक्षक, मुंबई यांच्याकडे ई मेलद्वारे तसेच श्री. हितेश वर्मा, खामगांव, जि. बुलढाणा व आदर्श इलेक्ट्रॉनिक्स, आर्णी रोड यवतमाळ यांनी अवधूत वाडी पोलीस स्टेशन, यवतमाळ येथील पोलीस ठाण्यात माहे सप्टेंबर, २०२३ वा त्या दरम्यांन तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्रावणकर यांनी त्यांच्या महालक्ष्मी रेफ्रिजरेटर अॅण्ड एसी सर्विसेस या फर्मच्या नावाने खामगांव, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यातील अनेक इलेक्ट्रॉनिक दुकानदारांची देखील लाखो रूपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी तेथील पोलीस ठाण्यात तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यवतमाळ येथील अधिकाऱ्यांची लाखो रूपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली असून पैसे परत मागितल्यास न वटणारे धनादेश देऊन आर्थिक फसवणूक व मानसिक त्रास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी करुन फसवणूक झालेल्या व्यक्तींना दिलासा देणेसंदर्भात तसेच संबंधितांविरूद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध दाखल झालेल्या विविध गुन्ह्यांमध्ये एकूण रु. ९,०५,०००/- इतक्या रकमेची फसवणूक झाली असल्याचे तसेच न वटणारे धनादेश दिले असल्याचे पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने पोलीसांनी केलेल्या तपासामध्ये आरोपीविरुद्ध अवधूतवाडी पोलीस स्टेशन, यवतमाळ येथे भारतीय दंड विधानच्या विविध कलमांन्वये ४ गुन्हे दाखल केले असून त्यापैकी अप.क्र. ३५९/२०२२, अप क्र.३६९/२०२२ व अप. क्र. ३९१/२०२२ या गुन्ह्यांमधील आरोपी विक्की श्रावणकर यास मा. न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन प्राप्त झाला आहे. सदर गुन्हयांतील तपास पूर्ण करून आरोपीविरुद्ध पोलीसांकडून मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच वरीलपैकी एका गुन्ह्यात आरोपीचे बॅंक खाते गोठविण्याकरिता संबंधीत बॅंकेशी पोलीसांकडून पत्रव्यवहार करण्यात आला असून याबाबत पुढील कार्यवाही पोलीसांकडून सुरू आहे.

इतर उर्वरित अप.क्र. १३६३/२०२३ या गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास सुरू असून त्यामध्ये निष्पन्न होणाऱ्या बाबींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही पोलीसांकडून करण्यात येत आहे. सदर गुन्ह्यात आरोपीस अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाच्या नावे बनावट पदवी प्रमाणपत्र दिली जात असल्याबाबत

**(४८) ७३९६७ (११-१२-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध आजारांचे निदान करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या लॅब टेक्निशियन या बीएस्सी, एमएलटी आणि डीएमएलटी या पदव्यांची कागदपत्रे महाराष्ट्र पॅरामेडिकल परिषदेकडे सादर केल्यानंतर पडताळणीअंती राज्यातील २० विद्यार्थ्यांच्या नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या नावे बनावट पदव्या असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी विद्यापीठाच्या समितीने केलेल्या चौकशीअंती दिनांक ३० डिसेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या अहवालानुसार संबंधित विद्यार्थ्यांना कायदेशीर नोटिसा बजावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठाच्या नावे बनावट कागदपत्रे व पदवी देणाऱ्या राज्यातील ४ संशयितांवर नाशिक तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०२१ पासून संबंधित दोन्हीही अभ्यासक्रम युजीसीच्या निर्देशानुसार मुक्त विद्यापीठाने बंद केलेले असून या गुन्हा प्रकरणी सहाय्यक निरीक्षक, नाशिक यांचेकडे तपासाचे काम सोपविण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) होय. सदर प्रकरणी बनावट कागदपत्रे व पदवी देणा-या ८ आरोपींवर तसेच बनावट प्रमाणपत्र प्राप्त करणा-या २० विद्यार्थ्यांवर नाशिक ग्रामीण पोलिस स्टेशन येथे गु.र.क्र. २६५/२०२३ दिनांक ७.८.२०२३ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणी बनावट पदवी देणा-या एकूण ८ आरोपींपैकी ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी दोन आरोपी जामीनावर मुक्त असून एक आरोपी दिनांक १८.१२.२०२३ पर्यंत पोलिस कोठडी रिमांड मध्ये आहे. २ आरोपी मयत असून इतर ३ आरोपीचा शोध सुरु आहे.

बोगस प्रमाणपत्र पदवी प्राप्त करणा-या २० विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थ्यांना सी.आर.पी.सी. कलम ४१ अ अन्वये पोलीसांकडून नोटीस देण्यात आली होती. सदर तपासात संबंधीत विद्यार्थ्यांनी सहकार्य केल्यामुळे तुर्तास त्यांना अटक करण्यात आलेली नाही. उर्वरीत एका विद्यार्थ्यास मा. जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक ग्रामीण यांनी अटकपूर्व जामीन नामंजूर केला असून सदर आरोपीविरुद्ध पुढील कारवाई पोलीसांकडून सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कृषी विभागाच्या विहिर योजनेला जुन्या निकषामुळे प्रतिसाद मिळत नसल्याबाबत

**(४९) ७४४७३ (११-१२-२०२३). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती/नवबौद्ध शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना राबविण्यात येत असून योजनेतील निकषांच्या तफावतीमुळे या

योजनेस योग्य प्रतिसाद मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात रोजगार हमी योजना व कृषी या दोन्ही विभागांतर्गत नवीन विहिरींसाठी पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत असून रोहयो अंतर्गत विहीरीसाठी ४ लाखांचे अनुदान व १५० मीटर अंतराची अट असून कृषी विभागामार्फत मात्र २.५० लक्ष रुपये अनुदान व ५०० मीटर अंतराची अट आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचे पुनर्विलोकन करुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर कृषी स्वावलंबन योजना राबविण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१५-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींसाठी २ विहिरीमधील १५० मीटरची अट अनुसूचित जाती, जमाती व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाकरिता लागू नाही, तर कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेमध्ये रु. २.५० लक्ष अनुदान व दोन विहिरींमध्ये ५०० फूट अंतराची अट आहे.
(३) व (४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत नवीन विहिरीसाठीची अनुदान मर्यादा रु.४.०० लक्ष करणे व दोन विहिरींमध्ये ५०० फूट अंतराची अट रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापकांच्या प्रलंबित भरतीबाबत

**(५०) ७५९९८ (२९-०२-२०२४). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध भागातील १११ सहाय्यक प्राध्यापकांचे पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदांची रोस्टर तपासणी होऊनही सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्यावतीने प्राध्यापक भरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठातील रिक्त असलेल्या सहाय्यक प्रदेश प्राध्यापकांच्या जागा नेट-सेट पीएच.डी धारक संघर्ष समितीच्यावतीने 'तुमची दिवाळी आमचं दिवाळं' असे आंदोलन करण्याबाबतचा इशारा देण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापकांची तात्काळ भरती करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(५) तसेच, शासनाने सहाय्यक प्राध्यापकांच्या रिक्त पदाच्या भरतीस मान्यता देऊनही दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०८-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सहायक प्राध्यापक पदांसाठी जाहिरात क्र.३६, दि.३० डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) होय.
(५) प्रश्न उदभवत नाही.
(६) प्रश्न उदभवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.